संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०२९ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

७० वर्ष

गुरूवार, दि. २२ जानेवारी २०२६





# ‘बजाज पुणे ग्रँड टूर’च्या दुसऱ्या टप्प्याचा दिमाखदार प्रारंभ

## मंत्री चंद्रकांतदादा पाटील, राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांची उपस्थिती | पुणे शहर, पुरंदर, राजगड व हवेली तालुक्यांत जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**पुणे (दै. संध्या)**

पुणे जिल्ह्याच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि निसर्गसंपन्न वारशाचे जागतिक पातळीवर दर्शन घडवणाऱ्या ‘बजाज पुणे ग्रँड टूर–२०२६’ या आंतरराष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेच्या दुसऱ्या टप्प्याचा आज मोठ्या उत्साहात दिमाखदार प्रारंभ झाला. कॅम्प येथील लेडीज क्लब परिसरातून उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील, सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या हस्ते झेंडा दाखवून या टप्प्याला सुरुवात करण्यात आली.

यावेळी पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेशकुमार, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पुण्याचे पोलीस सहआयुक्त रंजनकुमार, पुणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी.पी. आदी उपस्थित होते.

मंत्री पाटील म्हणाले, “या स्पर्धेचे आयोजन करताना ते एक स्वप्न वाटत होते. मात्र उत्कृष्ट नियोजन आणि समन्वयामुळे हे भव्य आयोजन यशस्वी झाले आहे. या स्पर्धेमुळे पुण्याचे नाव जगभर पोहोचले असून सायकलिंगच्या इतिहासात पुण्याची ठळक नोंद झाली आहे. ज्या प्रकारे पुणे पुस्तक महोत्सवाने विविध विश्वविक्रम प्रस्थापित केले, त्याचप्रमाणे या स्पर्धेलाही मोठा प्रतिसाद मिळत आहे. यामुळे पुण्याचा लौकीक वाढेलच, शिवाय जिल्ह्याच्या विकास प्रक्रियेलाही चालना मिळेल.

जगभरातील नागरिकांचे लक्ष या स्पर्धेकडे लागले असून विविध देशांतील खेळाडू आणि पर्यटक पुण्यात दाखल होत असल्याने जिल्ह्याच्या आर्थिक विकासालाही गती मिळेल, असा विश्वास व्यक्त करत त्यांनी नागरिकांच्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले.

राज्यमंत्री माधुरी मिसाळ म्हणाल्या, पुणे हे औद्योगिक तसेच सांस्कृतिक शहर आहे. या आंतरराष्ट्रीय स्पर्धेच्या माध्यमातून पुण्याची ओळख जागतिक स्तरावर अधिक भक्कम होणार आहे. यामुळे पर्यटन क्षेत्राला चालना मिळेलच, तसेच नव्या पिढीतील सायकलपटूंना आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर पोहोचण्यासाठी प्रेरणा मिळेल.

दुपारी १.३० वाजता सुरू झालेला हा दुसरा टप्पा एकूण १०९.१५ किलोमीटर अंतराचा होता. पुणे शहर, पुरंदर, राजगड आणि हवेली या चार तालुक्यांतील ऐतिहासिक, ग्रामीण आणि डोंगराळ भागांतून जाणारा हा आव्हानात्मक मार्ग असल्याने देश-विदेशातील नामवंत सायकलपटूंनी या मार्गावर आपली ताकद, तंत्र आणि सहनशक्तीचे दर्शन घडवले. छत्रपती संभाजी महाराजांचा जन्म झालेल्या पुरंदर किल्ल्याच्या पायथ्यापासून पुढे वेल्हे व भोर परिसरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पावन स्पर्शाने पवित्र झालेल्या भूमीतून सायकलपटूंनी दमदार रपेट करत सिंहगड रोडवरील नांदेड सिटी परिसरात हा थरारक टप्पा संपविला. चढ-उतार, घाटवाटा आणि लांब पल्ल्यामुळे हा टप्पा सायकलपटूंसाठी शारीरिक क्षमतेची कसोटी पाहणारा ठरला.

स्थानिक महिलांनी आणि ज्येष्ठ नागरिकांनी पुष्पवृष्टी करून सायकलपटूंचे स्वागत केले, तर आंतरराष्ट्रीय खेळाडूंशी सेल्फी घेण्यासाठी तरुणांमध्ये विशेष उत्सुकता दिसून आली. पुणेकरांच्या आपुलकीने आणि आदरातिथ्याने अनेक परदेशी सायकलपटू भारावून गेल्याचे चित्र पाहायला मिळाले.

या स्पर्धेसाठी जिल्हा प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता. पोलीस दल, वाहतूक शाखा आणि शेकडो स्वयंसेवकांच्या सहकार्यामुळे रस्त्यावरील मोठी गर्दी असूनही हा १०९.१५ किलोमीटरचा टप्पा अत्यंत सुरक्षित, शिस्तबद्ध आणि यशस्वीरीत्या पार पडला.

### असा होता मार्ग

लेडीज क्लब (कॅम्प), गोळीबार चौक, कोंढवा, येवलेवाडी, भिवरी, चांबळी, कोडीत, नारायणपूर, चिव्हेवाडी, केतकावळे, कापूरहोळ, कासुर्डी, मोहरी, जांबळी, आंबवणे, करंजावणे, वांगणी, निघडे, कुसगाव, शिवापूर, कोंढणपूर. या मार्गावरील पुरंदर किल्ला, सिंहगड घाट रोड, डोणजे, किरकिटवाडी आणि खडकवासला धरणाचे थेट प्रक्षेपण प्रेक्षकांसाठी विशेष आकर्षण ठरले. या टप्प्यादरम्यान कॅम्प, कोंढवा, येवलेवाडी, ग्रामीण भाग तसेच घाटमाथ्यावर मोठ्या प्रमाणात नागरिकांनी गर्दी करत सायकलपटूंना जल्लोषात प्रोत्साहन दिले. युवकांचा सळसळता उत्साह, ‘भारत माता की जय’ आणि ‘जय भवानी, जय शिवराय’च्या घोषणांनी संपूर्ण मार्ग भारावून गेला. काही ठिकाणी हलगी, ढोल-ताशा आणि लेझिम पथकांच्या गजरामुळे या स्पर्धेला लोकोत्सवाचे स्वरूप प्राप्त झाले.

### ढिंग-टांग




### ब्रेकिंग न्यूज

#### ठाकरे गटाच्या गटनेतेपदी पेडणेकर

मुंबई (दै. संध्या) : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने मुंबई महापालिकेतील पक्षाच्या गटनेतेपदी किशोरी पेडणेकर यांची नियुक्ती केली आहे. किशोरी पेडणेकरांनी यापूर्वी मुंबईच्या महापौर म्हणून काम केले आहे. त्यानंतर आता पक्षाने पुन्हा एकदा त्यांच्यावर मोठी जबाबदारी सोपवली आहे. मुंबई महापालिकेची गत 15 तारखेला निवडणूक झाली. त्यानंतर दुसऱ्या दिवशी झालेल्या मतमोजणीत भाजपला सर्वाधिक 89 जागा मिळाल्या, तर ठाकरे बंधूंच्या युतीला अवघ्या 71 जागांवर समाधान मानावे लागले. परिणामी, ठाकरेंची मुंबई महापालिकेवरील तब्बल 25 वर्षांची सत्ता संपुष्टात आली. या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाने आज मुंबई महापालिकेतील पक्षाच्या गटनेतेपदी किशोरी पेडणेकर यांची निवड केली. किशोरी पेडणेकर मुंबई महापालिकेच्या वॉर्ड क्रमांक 199 मधून विजयी झाल्या होत्या. त्यांनी शिंदे गटाच्या आपल्या प्रतिस्पर्धी उमेदवार रुपल कुसळे यांचा पराभव केला. ठाकरे गटाच्या गटनेतेपदासाठी किशोरी पेडणेकर यांच्यासह विशाखा राऊत, मिलिंद वैद्य व श्रद्धा जाधव यांची नावे चर्चेत होती.

## केडीएमसीमध्ये मनसे-शिवसेना एकत्र

**मुंबई (दै. संध्या)**

राज्यात महापालिका निवडणुकांच्या निकालानंतर आता सत्ता स्थापनेसाठी नाट्यमय घडामोडी घडत आहेत. मुंबईचा महापौर कोण होणार याची उत्सुकता सर्वांना लागली असतानाच, तिकडे कल्याण डोंबिवली महापालिकेत मनसेनं शिंदेंच्या शिवसेनेला पाठिंबा दिला आहे. सत्तेत असल्याशिवाय काहीतरी मिळणार नाही, असे म्हणत मनसे नेते राजू पाटील यांनी या युतीवर प्रतिक्रिया दिली. तर, बाळा नांदगावकर यांनीही एकप्रकारे हा स्थानिक युतीचा विषय असल्याचे सांगत याचे समर्थन केले आहे. आता, केडीएमसीमधील युतीवर शिवसेना ठाकरे गटाकडून प्रतिक्रिया आली आहे. शिवसेना प्रवक्ते खासदार संजय राऊत आणि नेते अनिल परब यांनी याबाबत प्रतिक्रिया दिली. संजय राऊत यांनी केडीएमसीतील शिवसेना-मनसे युतीवरही भाष्य केलं. यासंदर्भात , राज ठाकरेंशी संवाद झाला, काही लोकांना काही भेटलं नाही, त्यातूनही ही भूमिका घेतली, असे संजय राऊत यांनी म्हटले. तर, अनिल परब यांनीही केडीएमसीतील युतीवर भाष्य केलं. कल्याण डोंबिवलीमध्ये मनसेने घेतलेली भूमिका ही त्यांची आहे, त्यांचा स्वतंत्र पक्ष आहे. मात्र, आमचे नगरसेवक आमच्यासोबत आहेत.

## कल्याण-डोंबिवलीमध्ये मतदारांशी गद्दारी!

- मनसेच्या 5 नगरसेवकांचा 65 हजार तर ठाकरेंना सोडणाऱ्या 4 नगरसेवकांकडून 45 हजार मतदारांचा विश्वासघात

**ठाणे (दै. संध्या)**

जगातील सर्वात मोठी लोकशाही असा गाजावाजा होत असलेल्या भारतातील लोकशाही... त्यातल्या त्यात महाराष्ट्रातील लोकशाही आता एका वेगळ्याच वळणावर आहे. त्याला कारण म्हणजे नुकत्याच झालेल्या नगरपालिका आणि महापालिकांच्या निवडणुका. निवडून आल्यानंतर अवघा एक आठवडाही होत नाही, तोपर्यंत या नगरसेवकांनी त्यांना मिळालेल्या मतांशी गद्दारी करून वेगळी भूमिका घेतल्याचं दिसून येतंय. कल्याण डोंबिवलीमध्ये ठाकरेंच्या चार उमेदवारांनी आणि



मनसेच्या पाच उमेदवारांनी विरोधात लढलेल्या शिंदेंच्या शिवसेनेला पाठिंबा दिल्याचं स्पष्ट झालंय. त्यातून त्यांना मिळालेल्या एक लाख मतदारांशी गद्दारी केल्याचं समोर येतंय. निवडणुकीआधी कल्याण डोंबिवली महापालिका चर्चेत आली ती सर्वाधिक बिनविरोध नगरसेवकांमुळे. या ठिकाणी भाजपचे 14 आणि शिवसेना शिंदे गटाचे 6 नगरसेवक बिनविरोध निवडून आले. त्यानंतर ही महापालिका चर्चेत आली तर भाजप आणि शिवसेनेतील महापौरपदाच्या रस्सीखेचवरून. आता त्या ठिकाणी परत फोडाफोडीची खेळी सुरू झाल्याचं दिसतंय. कल्याण डोंबिवलीमध्ये शिंदेंच्या शिवसेनेला ठाकरेंच्या चार नगरसेवकांनी आणि मनसेच्या पाच नगरसेवकांनी पाठिंबा दिला आहे. कल्याण डोंबिवलीत शिवसेनेचे 53, मनसेचे 5 नगरसेवक असे मिळून 58 होत आहेत. ठाकरेंच्या शिवसेनेचे 11 पैकी चार नगरसेवकही शिंदेंना पाठिंबा देतील अशी शक्यता आहे. त्यामुळे शिवसेनेनं बहुमताच आकडा गाठल्याचं दिसतंय. कल्याण डोंबिवलीमध्ये भाजपला शह देण्यासाठी शिंदे गटाकडून मनसेचा पाठिंबा घेण्यात आला. लोकांची कामं करण्यासाठी सत्तेला चिकटून राहिलं पाहिजे असं वक्तव्य मनसेच्या राजू पाटलांनी केलं. पण याच शिंदे गटाच्या विरोधात त्यांच्या पक्षाचे नेते राज ठाकरे यांनी काही दिवसांपूर्वीच टीका केली होती. शिंदेंची शिवसेना किंवा भाजप नको म्हणून ज्या लोकांनी मनसेला मतदान केलं त्यांच्या मताचं काय?

## राष्ट्रवादीच्या कैलास इंगळेंनीही धरले 'कमळ'; भाजपची 'स्वबळा'ची घोषणा अन् उमेदवारांची यादी जाहीर

# पुरंदरच्या राजकारणात मोठा भूकंप

**सासवड (दै. संध्या)**

- शिवसेना तालुकाप्रमुख हरिभाऊ लोळेंचा भाजपमध्ये प्रवेश

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीच्या उमेदवारी अर्ज भरण्याच्या अखेरच्या दिवशी बुधवारी (ता. २१) पुरंदर तालुक्यात प्रचंड राजकीय घडामोडी घडल्या. आमदार विजय शिवतारे यांचे खंदे समर्थक व शिवसेनेचे पुरंदर तालुकाप्रमुख हरिभाऊ लोळे यांनी माजी आमदार संजय जगताप यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला आहे. या प्रवेशामुळे तालुक्यातील राजकीय समीकरणे बदलली असून, त्यांना वीर-भिवडी या जिल्हा परिषद गटाची उमेदवारी देण्यात आली आहे. हरिभाऊ लोळे हे शिवतारे यांचे कट्टर



समर्थक मानले जात होते, तसेच त्यांच्या पत्नी नलिनी लोळे यांनी शिवसेनेकडून पंचायत समितीच्या सभापती पदाची धुराही सांभाळली होती. "पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विकासाच्या मुद्द्यांमुळे मी भाजपची विचारधारा स्वीकारली आहे," असे लोळे यांनी यावेळी सांगितले. दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते कैलास इंगळे यांनीही पक्षाचा राजीनामा देत भाजपमध्ये प्रवेश केला आहे. त्याचे बक्षीस म्हणून त्यांचे चिरंजीव अजय इंगळे यांना बेलसर-माळशिरस जिल्हा परिषद गटातून उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.माजी आमदार संजय जगताप यांनी पत्रकार परिषदेत भाजपची 'स्वबळा'ची घोषणा केली. यामुळे तालुक्यातील सेना-भाजप युतीच्या चर्चेला आता पूर्णविराम मिळाला आहे. तालुक्यात ४ जिल्हा परिषद गट आणि ८ पंचायत समिती गण असून, भाजपाकडून एकूण १०९ उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले आहेत.

याप्रसंगी गंगाराम जगदाळे, गिरीष जगताप यांसह सर्व उमेदवार व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संभाजी काळाणे यांनी केले तर संदीप फडतरे यांनी आभार मानले. अर्ज माघारी घेण्याच्या दिवशी अंतिम चित्र स्पष्ट होईल, असेही जगताप यांनी नमूद केले.

### भाजपचे अधिकृत उमेदवार खालीलप्रमाणे:

१. वीर - भिवडी विभाग:
   जिल्हा परिषद गट: हरिभाऊ लोळे
   वीर गण: सुधीर धुमाळ, निलेश जाधव
   भिवडी गण: सायली मनोज शिंदे, संगिता चंद्रकांत बोरकर
२. दिवे - गराडे विभाग:
   जिल्हा परिषद गट: दिव्या गंगाराम जगदाळे
   दिवे गण: सुनील कुंजीर, देविदास कामथे
   गराडे गण: ललिता दिलीप कटके, रेखा संभाजी फडतरे
३. बेलसर - माळशिरस विभाग:
   जिल्हा परिषद गट: अजय कैलास इंगळे
   बेलसर गण: कैलास जगताप, तुषार झुरंगे
   माळशिरस गण: माऊली यादव
४. निरा - कोळविहीरे विभाग:
   जिल्हा परिषद गट: सीमा संदीप धायगुडे
   निरा शिवतक्रार गण: वंदना बाळासो भोसले

# संपादकीय

## नवीन अध्यक्ष

नितीन यांनी भाजपच्या विजयाचा केवळ दावाच केला नाही, तर निकालाचा अचूक अंदाज वर्तवला होता. त्यानंतर देशात झालेल्या निवडणुकीवेळीही त्यांचा अंदाज अचूक ठरला, तेव्हाच या तरुणाकडे विशेष राजकीय कौशल्य आणि राजकीय समज असल्याची खात्री वरिष्ठ नेत्यांना पटली. नवीन अध्यक्ष विचारविनिमय करून वरिष्ठ नेत्यांनी नाव ठरवलं असलं, तरी पक्षाच्या घटनेनुसार संपूर्ण लोकशाही प्रक्रिया पूर्ण करूनच भारतीय जनता पक्षाचे बारावे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून नितीन नवीन यांची बिनविरोध निवड झाली. १४ डिसेंबर २०२५ रोजी त्यांची पक्षाच्या कार्यकारी अध्यक्षपदी निवड झाली, तेव्हांच पक्षाच्या अध्यक्षपदीही तेच येतील, असा अंदाज होता. अंदाजच; कारण राजकारणात प्रत्येक गोष्टीत हजार शक्यता असतात. इथे ग्रामपंचायतीचा सदस्य होण्यासाठी प्रत्येक पक्षात इच्छुकांची झुंबड, बंडखोरी असे सारे प्रकार तुंबळ होताना जगातल्या सर्वात मोठ्या पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षाची निवड बिनबोभाट बिनविरोध होते, ही साधी गोष्ट नाही. पक्षातल्या या सर्वोच्च पदासाठी काही कमी इच्छुक नसतील. अनेकांनी त्यासाठी लॉबिंगही केलं असेल. पण, त्याची कुठेही चर्चा झाली नाही. वरिष्ठ नेत्यांनी विचारविनिमय करून सहमतीने एखादं नाव ठरवलं, की त्यानंतर नाराजी, असमाधानाची कुठे एक ओळही नाही. आजच्या काळात हे किती अवघड आहे, याची कल्पना आपणां सगळ्यांनाच आहे. भाजपच्या वरिष्ठ नेत्यांचा पक्षात किती धाक आहे, पक्ष संघटनेवर त्यांची किती मजबूत पकड आहे, हेच या सगळ्या निवड प्रक्रियेतून स्पष्ट होतं. अन्य पक्षांनी यावरून बरंच काही शिकण्यासारखं आहे. नवीन यांच्या निवडीवेळी, मंगळवारी सर्व वरिष्ठ नेत्यांनी आणि संपूर्ण कार्यकारिणीने हजर राहण्यालाही प्रतिकात्मक का होईना, पण मोठा अर्थ आहे. नवीन यांचं नांव जाहीर झाल्यानंतर त्यांच्या गौरवार्थ बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मी पक्षाचा एक कार्यकर्ता आहे आणि नितीन नवीन हे माझे बॉस आहेत!' हे केलेलं वक्तव्य त्या पक्षात पक्ष संघटनेला असलेलं महत्त्व अधोरेखित करतं. यामुळे तरुणांना पक्ष संघटनेत काम करण्यास उत्साह मिळतो आणि जे पदाधिकारी आहेत, त्यांनाही समाधान मिळतं. पक्ष संघटनेचं बळ अशा एका वाक्यानेही वाढत असतं. हेच भाजपचं इतर पक्षांपेक्षा वेगळेपण आहे. नितीन नवीन यांचा एकमेव उमेदवारी अर्ज असणार, हे सगळ्यांसाठी स्पष्ट असलं तरी त्यांच्या समर्थनार्थ एकूण ३७ वेगवेगळ्या गटांकडून समर्थनपत्रं दिली गेली होती. त्यातल्या एका समर्थनपत्रावर तर खुद्द पंतप्रधान मोदी आणि संसदीय पक्षाच्या सदस्यांच्या सह्या होत्या. नितीन हे भाजपचे सर्वात तरुण अध्यक्ष असले, तरी राजकारणात नवखे नाहीत. त्यांचे वडील, किशोरप्रसाद सिन्हा हे भाजपचे बिहारमधल्या बांकीपूर मतदारसंघात आमदार होते. त्यांच्या निधनानंतर २००६ मध्ये झालेल्या पोटनिवडणुकीत वयाच्या अवघ्या सव्विसाव्या वर्षी नितीन पहिल्यांदा त्याच मतदारसंघातून आमदार झाले. त्यानंतर सलग पाच निवडणुका त्यांनी जिंकल्या. लहान वयात त्यांनी अखिल भारतीय परिषदेचे काम केले. भारतीय युवा मोर्चाचे सरचिटणीस आणि पक्षाचे बिहारचे प्रदेशाध्यक्ष म्हणूनही त्यांनी जबाबदाऱ्या सांभाळल्या. २०२५च्या विधानसभा निवडणुकीनंतर त्यांना नितीशकुमार सरकारमध्ये थेट कॅबिनेट मंत्रीपद दिलं गेलं. सार्वजनिक बांधकाम विभागासारखं महत्त्वाचं खातंही मिळालं. वयाच्या अवघ्या ४५व्या वर्षी थेट पक्षाच्या अध्यक्षपदासाठी त्यांच्या नांवाचा विचार होण्याला ही सगळी पार्श्वभूमी कारण आहेच; पण, खरं कारण ठरलं, त्यांनी २०२३ मध्ये झालेल्या छत्तीसगड विधानसभा निवडणुकीत केलेलं काम. काँग्रेसचा हा बालेकिल्ला भेदण्यासाठी त्यांच्यावर सह प्रभारीपदाची जबाबदारी सोपवण्यात आली होती. ही जबाबदारी निभावताना त्यांनी केलेली कामगिरी पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांच्या नजरेत भरली. सगळेजण तिथे काँग्रेसचंच सरकार येणार, असं म्हणत असल्याने मतदानोत्तर चाचण्यांनीही तोच निकाल लावला! नितीन यांनी भाजपच्या विजयाचा केवळ दावाच केला नाही, तर निकालाचा अचूक अंदाज वर्तवला होता. त्यानंतर देशात झालेल्या निवडणुकीवेळीही त्यांचा अंदाज अचूक ठरला, तेव्हाच या तरुणाकडे विशेष राजकीय कौशल्य आणि राजकीय समज असल्याची खात्री वरिष्ठ नेत्यांना पटली. भाजपच्या अध्यक्षपदासाठी काही कमी नांवं नव्हती.

## गुरु वचन

### मजबूत मन हेच सामर्थ्य

एखाद्या शास्त्रीय नर्तिकेचा अपघातात एक पाय निकामी होऊनही तिची नृत्याची जिद्द कमी होत नाही. ती नकली पाय बसवून व्यासपीठावर नाचते. एखाद्या क्रिकेटपटूने चांगला खेळ केला तरीही त्याला संघाबाहेर जाण्याचा रस्ता दाखविला जातो. परंतु, तो हार न मानता पुन्हा संघात दाखल होतो. एका महान चित्रपट निर्मात्याच्या महत्त्वाकांक्षी चित्रपटाला दर्शकांनी नकार दिल्यानंतर तो पुन्हा एक चित्रपट निर्माण करतो आणि तो चित्रपट इतिहास घडवितो किंवा मैलाचा दगड ठरतो. असे नेहमीच होते. कारण जगात दोन प्रकारचे लोक असतात. एक म्हणचे कमजोर मनाचे आणि दुसरे म्हणजे मजबूत मन असलेले. कमजोर मन असणाऱ्या लोकांमध्ये संकटाचा सामना करण्याचे धाडस नसते. त्यामुळे ते अधिकधिक कमजोर होऊन तक्रार करणे, रडणे यामुळे अयशस्वी होतात. मात्र आपल्या अपयशाचे खापर दुसऱ्याच्या माथ्यावर फोडण्यासाठी कारणे शोधतात. मजबूत मन असणारे लोक असे नसतात. ते प्रत्येक संकटाचा धैर्याने सामना करतात. टीकाकारांनी केलेली टीका त्यांचे मन बदलू शकत नाही. ते आपली हिंमत गमावत नाहीत, ते तक्रार करत नाहीत. ते प्रत्येक घटनेचा सकारात्मक बाजूने विचार करून एक दिवस यशस्वी होतात. कारण, त्यांच्यामध्ये संकटाच्याकाळी आत्मविश्वास आणि महत्त्वाकांक्षा असते. ते जीवनातील प्रत्येक आव्हानाचा अधिकाधिक फायदा घेण्याचा प्रयत्न करत असतात. आपण यापैकी कसे आहात आणि कसे बनू इच्छिता, ते ठरविण्याचा अधिकार आपल्याला आहे. कारण, जीवनात प्रत्येकाला एक प्रश्न विचारला जातो तो म्हणजे, आपण साहसी बनू इच्छिता की भित्रे? सकारात्मक विचार करणारा कधीच भित्रा बनू शकत नाही. कारण, त्याचा स्वत:वर, जीवनावर आणि ईश्वरावर विश्वास असतो. ते उच्च विचारशक्ती आणि आत्मविश्वासाने आपले काम करतात. असे लोक आपल्यासाठी काम करतातच पण त्यांच्यामुळे देश आणि समाजाची प्रगती होत असते. असेच लोक देश आणि समाजाची अनमोल संपत्ती असतात. म्हणून नेहमी आपले मन मजबूत ठेवा. कारण, ए. पी. जे. अब्दुल कलाम, धीरूभाई अंबानी, अमिताभ बच्चन आणि सचिन तेंडूलकर या महान लोकांनी जन्म घेतला नसता तर एवढे मोठे कर्म त्याच्या हातून झाले नसते.

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ८४१

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | | | | 7 | 6 | | | 1 |
| | | | 1 | 2 | 8 | 5 | 9 | |
| | | | | 3 | | | | 6 |
| | | 3 | | | | 6 | 1 | 7 |
| | 6 | | 3 | 9 | 7 | | 4 | |
| 7 | 4 | 8 | | | | 9 | | |
| 2 | | | | 6 | | | | |
| | 1 | 4 | 8 | 5 | 3 | | | |
| 5 | | | 7 | 4 | | | | 8 |

### : सूडोकु :

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोड्याचे केवळ एकच उत्तर आहे.या कोड्याला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. ८४० चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 3 | 4 | 9 | 8 | 5 | 1 | 7 | 6 |
| 7 | 5 | 1 | 2 | 3 | 6 | 8 | 4 | 9 |
| 9 | 8 | 6 | 1 | 7 | 4 | 5 | 3 | 2 |
| 8 | 2 | 7 | 4 | 5 | 9 | 3 | 6 | 1 |
| 3 | 4 | 5 | 6 | 1 | 7 | 2 | 9 | 8 |
| 6 | 1 | 9 | 3 | 2 | 8 | 7 | 5 | 4 |
| 5 | 9 | 2 | 8 | 4 | 3 | 6 | 1 | 7 |
| 1 | 6 | 3 | 7 | 9 | 2 | 4 | 8 | 5 |
| 4 | 7 | 8 | 5 | 6 | 1 | 9 | 2 | 3 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १८३७ – दक्षिण सीरीयात भूकंपाने हजारो ठार.
- १९५६ – लॉस अंजेलीसमध्ये रेल्वे अपघातात ३० जण ठार.
- १९८८ – प्रथमश्रेणी क्रिकेटमध्ये ब्रायन लाराचे पदार्पण.
- १९८८ – प्रथमश्रेणी क्रिकेटमध्ये हॅन्सी क्रोनीएचे पदार्पण.
- १९९० – ॲडीलेड येथे कसोटीत वसीम अक्रमने शतक झळकवले. त्याने १२३ धावा केल्या.
- १९९४ – सुमात्रामध्ये ५.५ तिव्रतेचा भूकंप आला.
- २००७ – इस्रोचे अंतराळ स्पेस कॅप्सुल रिकव्हरी एक्सपिरिमेंट (एसआरई-१) यशस्वीरीत्या पृथ्वीवर परतले.

### राष्ट्रीय

- २००८ – मातोश्री भीमाबाई आंबेडकर पुरस्कारासाठी सामाजिक न्याय व मानवी हक्कासाठी लढा देणाऱ्या ज्येष्ठ कार्यकर्त्या पद्मश्री तिस्ता सेतलवाड यांची निवड करण्यात आली.


### जन्म

- १५७९ – इंग्लिश नेते रॉबर्ट बरुस कॉटन यांचा जन्म.
- १८७४ – पोलंडचे पंतप्रधान वेनसेंटी वीटोज यांचा जन्म.
- १८९० – अमेरीकी सर्वोच्च न्यायालयाचे तेरावे सरन्यायधीश फ्रेड एम. वीनसन यांचा जन्म.
- १९७९ – ११९७ ची मीस स्वीटझरकलंड युनिव्हर्स मेलानी वीनीगर यांचा जन्म.

### निधन

- १५८१ – डॅच नेते सींप गलामा यांचे निधन.
- १९९२ – इराणचे पंतप्रधान अली अमीनी यांचे निधन.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८४१



**आडवे शब्द**

१. नमुना, मासला
३. वार्ताहर
७. चमकणारी बंगाली मिठाई?
१०. मिठी
१०अ. आस्था, प्रेम, माया
१२. मिठाला न जगणारा
१४. अंदाज करणे
१७. घाण
१८. 'आ'काराचे चिन्ह
१९. मांडणी, सजावट
२१. पायापासून डोक्यापर्यंत
२३. ज्वारी-बाजरीचा पदार्थ
२५. वर्तमानपत्रातीक कप्पा
२७. शूर
२९. काचेला पडलेली चीर
३०. उलटसुलट आगबोटच!
३२. सैन्याचा मालपुरवठा
३४. प्रामाणिख, सोज्वळ
३६. शत्रूच्या नाशाचे मंत्रतंत्र
३८. चामखीळ
४०. भरभराट
४१. डोंगरा किल्ला
४२. वाळा, ४३. घटस्फोट
४४. मगज
४५. प्रार्थना
४६. मंत्रीमंडळ
४८. गंध उगाळण्याचे जोडसाधन
५०. आजूबाजूला
५०अ. तोरा, माज
५१. जाणीव
५२. अब्रूदार
५५. महात्मा गांधीजींचे नाव
५७. दृष्टीभेट
६१. सदोदित
६३. जुनीच्या विरुद्ध
६५. राखण करणारा
६७. चटकन, त्वरित
६८. सज्जनगडचे संत
७१. गंध
७२. अर्धांगवायू
७३. गव्हाचे पीठ
७४. मालाची विक्री
७६. सडक
७७. बाळभाषते देव
७८. कणीदार
७९. फळांचे पेय

**उभे शब्द**

१. डोंगा
२. अननुभवी
३. थापा
४. माशाची रास
५. किंमत
६. दागदागिने
७. ओरखडा
८. माझे
९. चार आठवडे
१०. पुष्परस
११. सापाची एक जात
१३. ही पिऊन लगेच गोरेपणा थोडाच मिळणार!
१५. कोंबड्याचे आवरणे
१६. कारणाशिवाय
१८. उसाच्या रसाचा घट्ट रांधा
२०. नाला, खंदक
२२. हेतू, कारण
२३. चारी ठाव जेवणातील दोन प्रमुख पदार्थ
२४. पादत्राण
२६. नासाडी, विध्वंस
२८. चांदी
३०. जून, निबर
३१. हिशोब
३३. क्षुल्लक किंमतीचे नाणे
३५. पदरी सैनिक बाळगणारा
३६. झोपेचे खोबरे!
३७. हिचे चोचले पुरवणे म्हणजे अनारोग्याला आमंत्रण
३९. एकमेकांसमोर
४३. सावरीचा असल्यास सगळ्यात मऊ
४४. तारणपत्र
४५. कमिशन, दलाली
४६. श्रीमंत
४६अ. लोखंड घसण्याचे हत्यार
४७. राख
४८. शिक्षा
४९. झोपडी
५३. दानशूर
५४. मातीचा कण
५६. पोते शिवण्याची सुई
५८. रात्री सुगंध पसरवणारी वनस्पती
५९. खाण्याची तंबाखू
६०. पातळसर
६१. पंजाबमधील एक नदी
६२. समशेर
६३. अपुऱ्या नाकाची
६५. अफूचे बीज
६६. खटला, हक्क (सांगणे)
६९. दहावी रास
७०. पुरावा असल्यास पुरेसा भक्कम
७३. खण पण कापड नव्हे
७५. पंख, दुसऱ्याचा

उत्तर उद्याच्या अंकात

**जम्बो शब्दकोडे क्र. ८४० चे उत्तर**

आडवे उत्तर : १.कावराबावरा ५.असाधारण ८.पर्ण ९.खट १०.जगन्नाथ १२.डम १३.वर १४.भाषण १५.कोसरा १६.कयास १८.वहिवाट २०.दाखला २२.डास २४.मानिनी २५.रटरट २४.दम ३०.नीट ३२.वर्तमानपत्र ३३.चरवी ३४.मनगट ३६.कारभार ३८.कर्ज ४०.पडाव ४१.रस ४२.खादी ४३.भोजनावळ ४५.डाका ४७.नाट ५०.नकलाकार ५२.जमा ५४.वारकरी ५६.पनीर ५८.जवळजवळ ६०.मस्त ६१.सनई ६३.घर ६४.सामना ६६.पुरता ६७.मरवा ६८.सागर ७०.रम्य ७१.राक्षस ७२.गवगवा ७३.दाम ७४.खास ७५.सोम ७६.लगत ७८.धरणीकंप ८०.साय ८१.अंतर ८२.खानदान ८३.सरडा

उभे उत्तर : १.कारभारीण २.राखणदार ३.बाट ४.राजस ५.अथक ६.धाडस ७.रम ८.परवा ११.गारडा १३.वहिनी १५.कोलार १७.यात्रा १८.वनिता १९.टवटवीत २१.खटपट २३.सदमा २६.टवका २८. मनकवडा २९.पत्रकार ३०.नीर ३१.जनकजननी ३३.चरखा ३५.गर्जना ३७.रसना ३९.मळकट ४०.परका ४४.वन ४६.काजळ ४८.टवाळ ४९.कोरी ५१.रजई ५३.माजघर ५५.कलम ५६.पळपुटा ५७.रमताराम ५९.वर ६१.सर ६२.नवागत ६४.साम्य ६५.नापास ६७.मसलत ६८.सागवान ६९.गवा ७०.रमणी ७३.दार ७४.खापर ७५.सोय ७७.गर ७८.धन ७९.कंस

## उपदेशकथा

### रुग्णसेवा

स्वामी विवेकानंद पाश्चात्य देशांचा प्रवास करून परत आले आणि त्यानंतर त्यांची प्रकृती खूपच खालावली. डॉक्टरांनी त्यांना संपूर्ण विश्रांतीचा सल्ला दिला म्हणून ते दार्जिलिंगला गेले. तेथे असतानाच त्यांना बातमी समजली की, कलकत्त्यात प्लेगने हाहाकार माजवला आहे. हजारो लोक मृत्युमुखी पडले आहेत. आपण अशावेळी विश्रांती घेत बसणे पूर्णपणे चूक आहे असे स्वामीजींना वाटले. प्लेगच्या रुग्णांची सेवा करताना प्राण गेला तरी चालेल पण आपण ही रुग्णसेवा केलीच पाहिजे, असे ठरवून ते कलकत्त्यास परत आले. तेथे आल्यावर त्यांनी एक पत्रक काढून सर्वत्र वाटले. त्यात म्हटले होते की, ज्यांना कोणाला कोणत्याही प्रकारची मदत हवी असेल, त्यांना ती रामकृष्ण संघाकडून मिळेल. त्यांनी सेवापथके स्थापन केली आणि रुग्णांची शुश्रूषा करण्याचे काम त्यांच्यावर सोपवले.

कथा उपदेश : जो आपले स्वत:चे दु:ख विसरून दुसऱ्याच्या मदतीसाठी धावतो तो खरा समाजसेवक होय.


: SMS :

Gandhiji said " NON Violence is the greatest force at the disposal of mankind." Issued in public interest by DAVP,Ministry of I&B, Govt Of India.


## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | २६.९ | १४.२ |
| अहमदनगर | २६.९ | १३.२ |
| अकोला | २८.९ | १७.१ |
| अमरावती | २८.३ | १८.२ |
| बीड | ३०.१ | १७.३ |
| भंडारा | २८.५ | १४.८ |
| बुलढाणा | २२.६ | ८.६ |
| चंद्रपूर | ३०.२ | १८.३ |
| चेन्नई | २९.३ | १८.२ |
| नवी दिल्ली | २२.९ | ९.९ |
| धुळे | २७.८ | १५ |
| गोंदिया | २८.१ | १५.९ |
| जळगाव | २७.८ | १६.८ |
| कोल्हापूर | २७.९ | ११.६ |
| लातूर | २७.७ | १७.१ |
| मुंबई | २६.५ | १९.६ |
| नागपूर | २७.९ | १५.१ |
| नांदेड | २९.१ | १८.९ |
| नंदूरबार | २५.९ | १४.४ |
| नाशिक | २७.१ | १२.९ |
| पुणे | २६.८ | १२.६ |
| पंढरपूर | २८.६ | १६.४ |
| सातारा | २७.८ | ८.९ |
| सांगली | २८.३ | १३.८ |
| सोलापूर | २८.९ | १६.८ |
| वर्धा | २९.२ | १६.५ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:पश्चिम कायदेशीर कामे पूर्ण होतील.अभ्यासात मन रमेल. कामातील विस्तार फायदेशीर ठरेल.

**वृषभ :** शुभ रंग:हिरवा, अनुकूल दिशा:पूर्व आजचा दिवस चांगला जाणार आहे. बुद्धी चातुर्याने येणारे संकट दूर होणार आहे.

**मिथुन :** शुभ रंग:केसरी, अनुकूल दिशा:उत्तर बुद्धिमत्ता आणि दूरदृष्टिपणाचे समाजात कौतुक होईल. सुखवस्तूंवर खर्च होईल.

**कर्क :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा:पूर्व सन्मान न मिळाल्याने निराश रहाल. कामे वेळेत पूर्ण होणार नाहीत. व्यापारात नवीन सौदे करू नका.

**सिंह :** शुभ रंग:गुलाबी, अनुकूल दिशा:पूर्व संपत्ती संबंधात केलेली धावपळ फायदेशीर ठरेल. स्पर्धेत यश मिळेल.

**कन्या :** शुभ रंग:निळा, अनुकूल दिशा:पूर्व प्रस्ताव मिळतील. योजना कार्यान्वित होतील. आर्थिक फायदा होण्याचे योग आहेत.

**तुळ :** शुभ रंग:पांढरा, अनुकूल दिशा:उत्तर नवीन प्रस्ताव आल्यामुळे आपला उत्साह वाढणार आहे. आपली किंमत वाढणार आहे.

**वृश्चिक :** शुभ रंग:लाल, अनुकूल दिशा:पूर्व सर्वच ठिकाणी आपणास यश नवीन संधी मिळणार आहे.

**धनु :** शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा :पूर्व वैवाहिक जीवन आनंदी राहिल्याने कामात उत्साह राहिल. आरोग्याच्या समस्या दूर होतील.

**मकर :** शुभ रंग : गुलाबी,शुभ दिशा:पश्चिम संकोच करू नका, अडचणी येतील. व्यवसायात कर्मचारी त्रास देतील.

**कुंभ :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पूर्व व्यापारात फायदा होईल. शत्रू परेशान होतील. यश, मान, प्रतिष्ठा यामध्ये वाढ होईल.

**मीन :** शुभ रंग:केसरी,शुभ दिशा: दक्षिण कार्यसिद्धि झाल्याने आर्थिक क्षेत्रात आशाजनक बदल घडून येतील. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | योग:वारीयन १७:३७:१७ |
| २२ जानेवारी २०२५ | करण:वणिज १४:४०:५७ |
| गुरूवार | करण:विष्टि २६:२८:३८+ |
| विक्रम संवत्– २०८२ | सूर्य:मकर |
| माघ शके संवत्– १९४७ | चन्द्र:कुम्भ |
| संवत्सर – विश्वावसूनाम | हिजरी सन् – १४४६ |
| अयन– उत्तरायणारंभ | मुस्लिम मास – शाबान |
| मास– माघ | तारीख – २ |
| ऋतु– सौर शिशिर | विशेष |
| शुक्ल पक्ष | विनायक चतुर्थ |
| तिथि:चतुर्थी | तिलकुंद चतुर्थी |
| २६:२८:३८+ | श्री गणेश जयंती |
| नक्षत्र:शतभिषा | वरद चतुर्थी पालखी |
| १४:२६:४३ | यात्रा – मोरगांव |


RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## बॅडमिंटन स्पर्धा : पीवायसी आणि हवेली तालुका बॅडमिंटन संघटनेच्या वतीने आयोजन

पुणे (दैनिक संध्या) : अनन्या गाडगीळ, जुई जाधव, ओजस जोशी यांनी पीवायसी-एचटीबीए १६व्या अमनोरा कप जिल्हा मानांकन सुपर-५०० बॅडमिंटन स्पर्धेत आपापल्या गटाचे विजेतेपद पटकावले. पीवायसी आणि हवेली तालुका बॅडमिंटन संघटनेच्या वतीने आयोजित ही स्पर्धा पीवायसी हिंदू जिमखान्याच्या बॅटमिंटन कोर्टवर ही स्पर्धा झाली. या स्पर्धेत महिला एकेरीच्या अंतिम फेरीत अनन्या गाडगीळने एस. डाखणेवर १५-७, १५-३ अशी सहज मात केली आणि जेतेपद पटकावले. यानंतर १९ वर्षांखालील मुलींच्या अंतिम फेरीत दुस-या मानांकित जुई जाधवने अग्रमानांकित नाव्या रांकाला १५-८, ६-१५, १५-१३ असा पराभवाचा धक्का दिला आणि जेतेपद पटकावले. स्पर्धेतील ११ वर्षांखालील मुलींच्या अंतिम फेरीत केयारा साखरेने आपल्या लौकिकाला साजेसा खेळ केला. तिने चौथ्या मानांकित काश्वीसिंहला १५-९, १५-१० असे सहज पराभूत केले. स्पर्धेतील १७ वर्षांखालील मुलांच्या एकेरीत अभिज्ञान सिंघाने बाजी मारली. त्याने अंतिम फेरीत माधव कामतला ७-१५, १५-५, १५-५ असे नमविले. १३ वर्षांखालील मुलांच्या गटात अद्वैत फेरेने विजेतेपद पटकावले. त्याने अग्रमानांकित अर्चित खान्देशेला १७-१५, १५-१३ असा पराभवाचा धक्का दिला. त्यामुळे अर्चितचे दुहेरी यशही हुकले. स्पर्धेतील १५ वर्षांखालील मुलांच्या गटात अर्जुन श्रीगडीवारने विजेतेपद पटकावले. त्याने अंतिम फेरीत अग्रमानांकित हृदान पाडवेला १५-१२, १५-१० असे नमविले आणि जेतेपद निश्चित केले. १९ वर्षांखालील मुलांच्या गटात ओजस जोशीने विजेतेपद पटकावले. त्याने अंतिम फेरीत अग्रमानांकित सार्थक पाटणकरचे आव्हान १५-१२, १५-९ असे परतवून लावले. स्पर्धेचे पारितोषिक वितरण हवेली तालुका बॅडमिंटन संघटनेचे अध्यक्ष अविनाश जाधव, सचिव उदय साने, सिटी कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकिय संचालक अनिरुद्ध देशपांडे, कॉर्पोरेट ॲथलिट्सचे संस्थापक आणि स्पर्धेचे संयोजन सचिव अभिजीत चांदगुडे आणि पीवायी हिंदू जिमखान्याचे सचिव सारंग लागू यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

## लाडकी बहिण योजनेसाठी मागासवर्गींचा निधी नको : राहुल डंबाळे

पुणे (दैनिक संध्या) : राज्य सरकारच्या मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेसाठी अनुसुचीत जातींसाठी राखीव असलेला सुमारे ३९३ कोटींचा निधी वर्गीकरण करणे अन्यायकारक असल्याने हि कृती सरकारने करु नये अशी भुमिका रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचे नेते राहुल डंबाळे यांनी व्यक्त केली आहे. सामाजिक न्याय विभागाने काल २० जानेवारी रोजी काढलेल्या शासन निर्णयानुसार या विभागाने समारे ३९३.२५ कोटी ( तीनशे त्र्यान्नव कोटी पंचवीस लाख ) इतका मोठा निधी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी वर्ग करण्याचा धक्कादायक निर्णय घेतलेला आहे. अनुसूचित जातींसाठीचा निधी अशा प्रकारे खर्च करता येत नसल्याने शासनाची ही कृती बेकायदेशीर असल्याचे मत डंबाळे यांनी व्यक्त केले आहे. यासंदर्भात रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीने राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच केंद्रीय व राज्य अनुसूचित जाती आयोग यांचेकडे तक्रार केलेली आहे. एकीकडे शिष्यवृत्ती, घरकूल , शिक्षण यांसह अनुसूचित जातींसाठींच्या योजनांना सरकार कात्री लावत असताना अशा प्रकारे पैशाची पळवा पळवू अन्यायकारक असल्याचे डंबाळे यांनी सांगितले.



## सौ. पूजा निकम यांचा सावर्डे जिल्हा परिषद गटातून उमेदवारी अर्ज दाखल

पुणे (दैनिक संध्या) : चिपळूण –संगमेश्वर विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार मा. शेखर निकम सर यांच्या सहचरणी आणि चिपळूण पंचायत समिती माजी सभापती सौ. पूजा निकम यांनी सावर्डे जिल्हा परिषद गटातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. सामाजिक बांधिलकी, विकासाभिमुख दृष्टिकोन आणि जनतेशी असलेली आत्मीय नाळ यामुळे सौ. पूजा निकम यांचे नाव परिसरात विश्वासाचे प्रतीक बनले आहे. सामान्यांच्या सुख-दुःखात कायम सहभागी राहणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख असून, महिलांच्या सक्षमीकरणापासून ग्रामविकासापर्यंत त्यांनी केलेले कार्य उल्लेखनीय आहे. आमदार शेखर निकम सरांच्या मार्गदर्शनाखाली जनसेवेचा वसा पुढे नेत, “विकास, विश्वास आणि संवेदनशीलता” या मूल्यांवर आधारित राजकारणाची नवी आशा त्यांनी या उमेदवारीतून निर्माण केली आहे. सावर्डे गटातील नागरिकांच्या अपेक्षा, स्वप्ने आणि प्रश्नांना प्राधान्य देत सर्वसमावेशक विकासाचा निर्धार व्यक्त करत सौ. पूजा निकम यांनी हा अर्ज दाखल केला. या उमेदवारीमुळे परिसरात नवचैतन्य निर्माण झाले असून, जनतेतून त्यांना उत्स्फूर्त पाठिंबा मिळत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

## वक्तृत्व स्पर्धेला उत्स्फुर्त प्रतिसाद

पुणे (दैनिक संध्या) : पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या येरवडा येथील डॉ.आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयातर्फे घेण्यात आलेल्या सुभेदार रामजी मालोजी आंबेडकर राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. या स्पर्धेत वरिष्ठ विभागातुन निर्मलाताई थोपटे शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या अमोल गोळे व कनिष्ठ विभागातुन अण्णासाहेब मगर महाविद्यालयाच्या प्राची पवार यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या सहयोगातुन यंदाही वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.गौतम बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. कैलास शिंदे, प्रा. गीतांजली हाके यांनी स्पर्धेचे यशस्वीरित्या नियोजन केले होते. स्पर्धेचे परीक्षक म्हणुन डॉ. गजानन भोसले, प्रा. प्रज्ञा कुलकर्णी, प्रा.शिवाजी मोटेगावकर यांना कामकाज पाहिले व निकाल जाहीर केला. पीपल्स एज्युकेशन सोसायटी उपाध्यक्ष डॉ. दत्ता देशकर यांच्या हस्ते विजेत्या स्पर्धकांना पारितोषिक देण्यात आले. वरिष्ठ विभागात प्रथम क्रमांक – अमोल गोळे (निर्मलाताई थोपटे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, भोर), द्वितीय क्रमांक – पूर्वा नाकतोडे (अण्णासाहेब मगर महाविद्यालय हडपसर) , तृतीय क्रमांक – रसिका भोसले (डॉ.आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालय, येरवडा), उत्तेजनार्थ – नितीन गागरेज (संस्कार मंदिर संस्था महाविद्यालय वारजे) तर कनिष्ठ विभागातुन प्रथम क्रमांक – प्राची पवार (श्री शिवछत्रपती महाविद्यालय, जुन्नर), द्वितीय क्रमांक – समर्थ देसाई (साधना महाविद्यालय, हडपसर), तृतीय क्रमांक – कार्तिकी सुरवसे (अण्णासाहेब मगर महाविद्यालय, हडपसर), उत्तेजनार्थ – पुष्पराज झोल (आबासाहेब गरवारे महाविद्यालय, पुणे) यानुसार विद्यार्थ्यांनी पारितोषिक प्राप्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.कैलास शिंदे यांनी केले. सुत्रसंचालन प्रा.डॉ. श्रेयसी परब, प्रा.गीतांजली हाके, प्रा.रीमा खरे यांनी केले.

# प्रशासकीय उदासीनतेमुळे शेतकरी कुटुंब हवालदिल

**भूमाफियांच्या त्रासाविरोधात आमरण उपोषणाचा इशारा : न्यायासाठी शेवटचा संघर्ष : शेतकरी कुटुंब २२ जानेवारीपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाला बसणार**

पुणे (दै. संध्या) :

खराडी येथील वडिलोपार्जित जमिनीच्या फसवणुकीप्रकरणी गेल्या अनेक वर्षांपासून प्रशासनाकडे दाद मागूनही कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने पीडित शेतकरी शेख कुटुंबाने अखेर टोकाचा निर्णय घेतला आहे. प्रशासनाच्या दिरंगाईला आणि भूमाफियांच्या त्रासाला कंटाळून शेख कुटुंबाने येत्या २२ जानेवारी २०२६ पासून पुणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सहकुटुंब आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. श्रमिक पत्रकार भवन या ठिकाणी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत शेतकरी आरीफ कासम बेग, राजाभाऊ चौधरी, प्रभा करपे, हसिना शेख, वकील ताहीर खान फिरोज बेग, आसिफ शेख हे बोलत होते.



खराडी (ता. हवेली) येथील सर्व्हे नंबर २२/२ मधील सुमारे ४ हेक्टर १० आर वडिलोपार्जित जमीन पैकी १२५.५ आर आणि २४आर इतकी जमीन काही अटी व शर्तींवर सन २००६ मध्ये गोयल गंगा डेव्हलपर्सला केवळ विकासासाठी, तेही १८ महिन्यांच्या मुदतीवर देण्यात आली होती. जयप्रकाश गोयल, अतुल गोयल आणि अमित गोयल यांनी आमची फसवणूक केली, असा गंभीर आरोप अर्जदार हसीना अन्वर शेख यांनी केला आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत केला.

या जमिनीवर न्यायालयाचा आदेश असतानाही बेकायदेशीरपणे सदनिका विक्री करण्यात आल्याचा आरोप केला आहे. याविरोधात आवाज उठविल्यानंतर ३ मे २०२१ रोजी तब्बल २०० ते ४०० गुंडांच्या जमावाने बेग आणि शेख कुटुंबावर प्राणघातक हल्ला केल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. कोरोना काळात जमावबंदी लागू असतानाही हा हल्ला झाला, मात्र पोलिसांकडून कोणतीही ठोस कारवाई झाली नाही, असा दावा कुटुंबाने केला आहे. व असे व्हिडिओ देखील त्यांनी पत्रकार परिषदेत दाखवले.

चंदननगर व खराडी पोलीस स्टेशन, पुणे महानगरपालिका तसेच दुय्यम निबंधक कार्यालयाकडे वारंवार तक्रारी करूनही अधिकारी दोषींनाच पाठीशी घालत असल्याचा आरोप बेग आणि शेख कुटुंबाने केला आहे. न्याय न मिळाल्यास बेमुदत साखळी उपोषण व आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारण्याचा निर्धार कुटुंबाने व्यक्त केला आहे. या काळात कुटुंबाला काहीही दगाफटका झाल्यास त्याची जबाबदारी प्रशासन व संबंधित भूमाफियांवर राहील, असा इशाराही देण्यात आला आहे.

सामाजिक कार्यकर्त्या प्रभा करपे म्हणाल्या की सदर प्रकरणात सरकारने लक्ष घालावे. कारण सदरील विषय फार गंभीर आहे. गोयल हा बिल्डर न्यायालयाचा अपमान करत आहे. येथून पुढे सामान्य माणूस सुद्धा न्यायालयात जाणं दहा वेळा विचार करेल तर ह्या कुटुंबांना न्याय मिळावा हीच एवढीच अपेक्षा आहे.

## महानगरपालिका हद्दीतील शाळा १२ वाजेनंतर राहणार बंद



पुणे (दै. संध्या) :

पुणे ग्रँड चॅलेंज टूर-२०२६ आंतरराष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेच्या अनुषंगाने चौथ्या टप्प्याच्याअनुषंगाने पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील सर्व सरकारी व खाजगी शाळा २३ जानेवारी रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत सुरु ठेवाव्यात; त्यांनतर शाळा बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. हे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष जितेंद्र डूडी यांनी जारी केले आहेत. स्पर्धेचा चौथा टप्पा हा बालेवाडी ते बालगंधर्व रंगमंदिर या दरम्यान आयोजित करण्यात आला असून त्याचे एकूण ५८ कि.मी अंतर आहे. त्यामुळे पुणे शहरातील होणारी वाहतूक कोंडी तसेच बहुतेक शाळेतील विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्याच्यादृष्टीने आदेश जारी करण्यात आल्याचेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

## नैसर्गिक साधनसंपत्ती-परिसंस्था किती दुर्बल झाल्या हे मोजले जात नाही

पुणे (दै. संध्या) :

- पर्यावरणशास्त्रज्ञ आणि लेखक डॉ. गुरुदास नूलकर
- श्री देवदेवेश्वर संस्थान अंतर्गत सारसबाग मंदिरातील श्री सिद्धिविनायक देवतेचा वार्षिक महोत्सवात व्याख्यानाचे आयोजन



झाडे जगवा हे आज केवळ गुळगुळीत वाक्य झाले आहे. कोणीही राजकीय पुढारी उठतो आणि 'झाडे लावा, झाडे जगवा' असे म्हणतो. पण त्यामागचा खरा अर्थ त्याला समजलेला नसतो. वनस्पती आपल्यासाठी सर्वकाही देतात आणि त्या नसतील, किंवा त्यांची संख्या कमी झाली, तर प्रकाशसंश्लेषणाची प्रक्रिया कमी होईल. त्यामुळे पृथ्वीची प्रकाशसंश्लेषण क्षमता कमी होईल, म्हणजेच अन्न तयार करण्याची क्षमता घटेल. आज आपण ही क्षमता कृत्रिमरीत्या वाढवण्याचा प्रयत्न करत आहोत. आपली आर्थिक व्यवस्था जीडीपी ने मोजली जाते पण प्रत्यक्षात नैसर्गिक साधनसंपत्ती किती घटली, आपल्या परिसंस्था किती दुर्बल झाल्या हे आपण मोजतच नाही, असे मत पर्यावरणशास्त्रज्ञ आणि लेखक डॉ.गुरुदास नूलकर यांनी व्यक्त केले.

श्री देवदेवेश्वर संस्थान अंतर्गत सारसबाग मंदिरातील श्री सिद्धिविनायक देवतेच्या वार्षिक महोत्सवात डॉ. गुरुदास नुलकर यांचे ‘निसर्ग संवर्धन आणि स्व-सुरक्षा’ या विषयावर व्याख्यान झाले. यावेळी राज्य सहकार निवडणूक प्राधिकरण आयुक्त अनिल कवडे, श्री देवदेवेश्वर संस्थानचे प्रमुख विश्वस्त रमेश भागवत, संस्थानचे विश्वस्त सुधीर पंडित, पुष्कर पेशवा, जगन्नाथ लडकत, आशिष कुलकर्णी उपस्थित होते.

डॉ.गुरुदास नूलकर म्हणाले, आपण ‘वाढ’ आणि ‘विकास’ या दोन संकल्पना समान अर्थाच्या समजतो. प्रत्यक्षात आपण फक्त वाढीकडे पाहतो, विकासाकडे नाही. रुग्णालयांची संख्या वाढली तर आपण त्याला प्रगती समजतो. परंतु समाजाचे आरोग्य चांगले असल्यामुळे रुग्णालयांची संख्या वाढण्याची गरजच भासू नये, याला आपण विकास न समजता कमी प्रगती समजतो. डॉ. गुरुदास नूलकर म्हणाले, आपण गेल्या शंभर वर्षांत वाहून येणारा सुपीक गाळ थांबवून टाकला आहे. तो कसा थांबवला? मोठ्या धरणांमुळे. आपण आजवर जी धरणे बांधली, त्यांच्यामुळे वरून येणारा गाळ पूर्णपणे अडवला गेला आहे. परिणामी, शेतीची उत्पादकता आज धोक्यात आली आहे. हा गाळ गंगा नदीतून सुंदरबनपर्यंत पोहोचत असे आणि त्यामुळे सुंदरबन पर्यावरणीयदृष्ट्या अतिशय उत्पादक परिसंस्था बनली होती. पृथ्वीवरील सर्वाधिक नैसर्गिक उत्पादनक्षमता असलेल्या परिसंस्थांमध्ये सुंदरबनचा समावेश होतो. मात्र आज सुंदरबनची परिसंस्था हळूहळू कमकुवत होत चालली आहे आणि त्याची नैसर्गिक उत्पादनक्षमता घटत आहे. धरणे शेतीसाठी नव्हे, तर मुख्यतः जलविद्युत निर्मितीसाठी बांधली गेली, ज्याचा लाभ दिल्लीसारख्या शहरांना होतो. गोडे पाणी आणि प्रकाशसंश्लेषण या दोन गोष्टींवर आपली संपूर्ण जीवनव्यवस्था अवलंबून आहे.

## ‘मिस्टर अँड मिस युनिव्हर्सिटी’ आणि ‘कॉलेज आयडॉल’ ग्रँड फायनलसह एनआयईएमचा रौप्य महोत्सव दिमाखात साजरा

पुणे (दै. संध्या) :

आशियातील पहिली इव्हेंट मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट असलेल्या NIEM (एनआयईएम) ने ‘मिस्टर अँड मिस युनिव्हर्सिटी’ आणि ‘कॉलेज आयडॉल’ या प्रतिष्ठित स्पर्धांच्या ग्रँड फायनलचे भव्य आयोजन करत आपल्या २५ वर्षांच्या गौरवशाली प्रवासाचा रौप्य महोत्सव दिमाखात साजरा केला. पुण्यातील Sunny's World येथे झालेल्या या सोहळ्याने युवकांच्या प्रतिभेला योग्य दिशा देत ‘उद्योगासाठी सज्ज’ इव्हेंट प्रोफेशनल्स घडवण्याच्या एनआयईएमच्या वचनबद्धतेला अधोरेखित केले.

हा उपक्रम एनआयईएमचे संस्थापक व डीन डॉ. होशी भिवंडीवाला यांच्या दूरदृष्टीतून साकारला आहे. भारतातील इव्हेंट



मॅनेजमेंट क्षेत्राचे जनक म्हणून त्यांची व्यापक ओळख आहे.

डॉ. भिवंडीवाला यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या कार्यक्रमाचे नियोजन निती बंगाली, प्रज्ञा चैतन्य, नागेश्वर पाठक, हर्ष दांगोद्रा, विहार मटाले, साक्षी ठाकूर आणि डॉ. कर्णा उपाध्याय यांनी केले. मुंबई व पुणे येथील एनआयईएमच्या विद्यार्थ्यांनी संपूर्ण कार्यक्रम यशस्वीरीत्या अंमलात आणत संस्थेच्या “प्रत्यक्ष अनुभवातून शिकणे” या तत्त्वज्ञानाचे प्रभावी दर्शन घडवले.

रौप्य महोत्सवाच्या ग्रँड फायनलला निवेदिता सराफ, गुलशन ग्रोवर, दिव्या दत्ता, निमरत कौर, उपेंद्र लिमये, कुशल बद्रिके आणि स्मिता गोंडकर यांची उपस्थिती लाभली. तसेच महम्मद मोरानी आणि लकी मोरानी यांच्या सातत्यपूर्ण मार्गदर्शनाबद्दल एनआयईएमने कृतज्ञता व्यक्त केली. याशिवाय मिकी मेहता, जमनादास मजेठिया (जेडी), लॉन्गिनस फर्नांडिस, सनी निम्हण, विपुल शाह, परेश गणात्रा, डेव्हिड व्हिटब्रेड आणि आशिन ए. शाह यांच्या सहकार्याबद्दलही आभार मानण्यात आले.

अंतिम फेरीतील स्पर्धकांसाठी साजिद खान, मिकी मेहता, जमनादास मजेठिया (जेडी), भावेश भाटीजा, अभ्यंग कुर्वेळकर आणि शिखा गोयल यांनी विशेष ग्रूमिंग व मेंटॉरिंग सत्रे घेतली. उद्घाटन सादरीकरणाची कोरिओग्राफी समीर तन्ना आणि अर्श तन्ना यांनी केली. फॅशन कोरिओग्राफी व ग्रूमिंग संदीप धर्मा यांनी सांभाळली. मेक-अप व हेअर स्टायलिंग लीना खांडेकर (ली’ज ब्यूटी) यांनी, स्टायलिंग मोहिनी क्षीरसागर यांनी, वॉर्डरोब रश्मी बुटीक कडून तर बीचवेअर ॲक्सेसरीज टीम पर्णकुटी यांनी पुरवली. सूत्रसंचालन ह्युगो डी’सूझा यांनी केले.

परीक्षक मंडळात महम्मद मोरानी, लकी मोरानी, मानसी स्कॉट, संदीप धर्मा, प्रणव मिश्र, शाम मशाळकर आणि सुभाष धांग यांचा समावेश होता. आत्मविश्वास, संवादकौशल्य, व्यक्तिमत्त्व आणि स्टेजवरील सादरीकरण या निकषांवर स्पर्धकांचे मूल्यमापन करण्यात आले.

## शुल्कवाढीचा चेंडू नव्या कारभाऱ्यांच्या कोर्टात

**जाहिरात फलक नियमन व नियंत्रण नियमानुसार नवीन दराचा निर्णय**

पुणे (दै. संध्या) :

महापालिकेकडून जाहिरात फलकांसाठी केलेली शुल्कवाढ योग्यच असल्याचा निकाल न्यायालयाने दिल्यानंतर महापालिका प्रशासनाने शहरातील जाहिरात फलकांचे परवाना शुल्क सुधारित करण्याचा निर्णय घेतला आहे. जाहिरात फलक नियमन व नियंत्रण नियमानुसार नवीन दर निश्चित केले आहेत. याबाबतचे तीन प्रस्ताव महापालिका प्रशासनाने मुख्य सभेसमोर मांडले होते. आचारसंहिता लागू होण्यापूर्वी या प्रस्तावांना स्थायी समितीची मान्यता मिळाली होती. मात्र, मुख्य सभेची अंतिम मान्यता मिळू शकली नव्हती. त्यामुळे सोमवारी झालेल्या मुख्य सभेत हे तिन्ही प्रस्ताव पुन्हा मांडण्यात आले. मात्र प्रशासकांनी या प्रस्तावांवर निर्णय न घेता विषय एक महिना पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता नव्या नगरसेवकांची मुख्य सभा या प्रस्तावांवर अंतिम निर्णय घेणार आहे. या निर्णयामुळे शहरातील होर्डिंगधारकांना तात्पुरता दिलासा मिळाला असला, तरी हा निर्णय आता नव्या नगसेवकांना घ्यावा लागणार आहे. प्रस्तावात शहरात सार्वजनिक जागांवर अनधिकृतपणे लावण्यात येणाऱ्या बोर्ड, बॅनर, फ्लेक्स आदींवर सध्या क्षेत्रीय कार्यालयांमार्फत दैनंदिन स्वरूपात निष्कासन कारवाई केली जाते. यासाठी आतापर्यंत अनधिकृत फ्लेक्ससाठी १ हजार रुपये दंड आणि जाहिरात फलक निष्कासनासाठी ५० हजार रुपये शुल्क आकारले जात होते.

## सह्याद्रीची शान 'इंदू': बजाज पुणे ग्रँड टूरचा नवा जागतिक चेहरा

पुणे (दै. संध्या) :

संकलन : जिल्हा माहिती कार्यालय, पुणे

सध्या पुणे जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यात 'बजाज पुणे ग्रँड टूर २०२६' चा थरार आणि उत्साह ओसंडून वाहत आहे. ही आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धा पहिल्यांदाच भारतात होत असताना, या स्पर्धेचा शुभंकर (Mascot) असलेल्या 'इंदू' या गोंडस शेकरूने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. 'इंदू' आता केवळ एक प्रतिक राहिली नसून, ती महाराष्ट्राच्या समृद्ध निसर्ग वारशाची जागतिक दूत बनली आहे. पुणे महानगर असो वा दुर्गम गावखेडी, सर्वत्र या 'इंदू'चीच चर्चा असून, त्यानिमित्ताने शेकरू आणि पुण्याचं अतूट नातं पुन्हा एकदा अधोरेखित झालं आहे.

शेकरू आणि पुण्याचे नाते समजून घेण्यासाठी आपल्याला सह्याद्रीच्या कुशीत असलेल्या भीमाशंकरच्या घनदाट अरण्यात जावे लागते. भीमाशंकराचा पावन परिसर आणि भीमा नदीचे उगमस्थान असलेल्या भीमाशंकर



अभयारण्याला निसर्गाचे वरदान लाभले आहे. समुद्रसपाटीपासून १ हजार २०० मीटर उंचीवर वसलेले हे अभयारण्य सुमारे १३ हजार ७८ हेक्टर क्षेत्रात पसरले असून १९८५ मध्ये त्याला अधिकृतरीत्या अभयारण्य घोषित करण्यात आले. प्रतिवर्षी येथे पडणारा सुमारे ४ हजार मिलीमीटर पाऊस इथल्या जमिनीला आणि वनराईला वर्षानुवर्षे समृद्ध करत आला आहे. या जंगलाचे संवर्धन करण्यात इथल्या स्थानिक आदिवासी बांधवांनी आणि ऐतिहासिक 'देवराई' परंपरेने मोलाचा वाटा उचलला आहे.

याच समृद्ध जंगलाचा मानबिंदू म्हणजे महाराष्ट्राचा राज्यप्राणी असलेला 'शेकरू' (Giant Squirrel). खरं तर, भीमाशंकर अभयारण्याची स्थापनाच प्रामुख्याने या मोठ्या खारीच्या अधिवासाला संरक्षण देण्यासाठी करण्यात आली होती.

शास्त्रोक्त भाषेत 'रॅटुफा इंडिका' म्हणून ओळखली जाणारी ही तांबूस खार केवळ समृद्ध जंगलाचे प्रतीक नसून सह्याद्रीच्या जैवविविधतेचा महत्त्वाचा दुवा आहे. भीमाशंकरचे स्थानिक नागरिक याला आदराने 'भीमाशंकरी' म्हणून ओळखतात.

शेकरूचे दिसणे अत्यंत मोहक असते. गुंजिसारखे लाल भडक डोळे, अंगावर तपकिरी तलम कोट, पोटावर पिवळसर पट्टा आणि लांबलचक झुपकेदार शेपूट ही त्याची वैशिष्ट्ये पर्यटकांना नेहमीच भुरळ घालतात. हे प्राणी अत्यंत लाजाळू असून प्रामुख्याने फळे, फुले आणि झाडांची साल खाऊन आपले जीवन जगतात. एकांतात राहणे पसंत करणारा हा प्राणी वर्षातून एकदाच एका पिल्लाला जन्म देतो. त्यामुळेच ही प्रजाती दुर्मिळ मानली जाते.

अशा या देखण्या आणि दुर्मिळ शेकरूला म्हणजेच 'इंदू'ला 'बजाज पुणे ग्रँड टूर'चा शुभंकर म्हणून निवडण्याचा निर्णय जिल्हा प्रशासनाने घेतला.

या स्पर्धेच्या निमित्ताने जगभरातील खेळाडू आणि क्रीडाप्रेमींना महाराष्ट्राच्या या राज्यप्राण्याची आणि भीमाशंकरच्या निसर्गवैभवाची ओळख होत आहे. क्रीडा स्पर्धेच्या माध्यमातून निसर्ग संवर्धनाचा हा संदेश पोहोचवणे, ही खरंच एक सुखावह बाब आहे. 'इंदू'च्या या प्रवासात आता अवघा महाराष्ट्र सामील झाला असून, सह्याद्रीचे हे वैभव जागतिक नकाशावर झळकत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### बौद्ध समाजाच्यावतीने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा जाहीर निषेध

बारामती (दैनिक संध्या) : शिवानी अभिजित देवकाते यांना राष्ट्रवादी पक्षाकडून निरावागज जिल्हा परिषद गटातून मिळालेल्या उमदेवारी नंतर बौध्द समाज आक्रमक होऊन सर्वांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील बौध्द समाजाच्या वतीने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला व तालुक्यातील बौद्ध समाजातील बांधव,पक्षातील पदाधिकारी,कार्यकर्ते यांच्यातर्फे तालुकाध्यक्ष संदीप बांदल यांना निवेदन देण्यात आले व निषेध नोंदविण्यात आला.



### कृषिक प्रदर्शनास माजी महसुल मंत्री एकनाथ खडसे यांची भेट

बारामती (दैनिक संध्या) : बुधवार, दि. २१ जानेवारी २०२६ रोजी ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टच्या कृषी विज्ञान केंद्र बारामतीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कृषी प्रदर्शनास शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त आणि मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद लाभला. आज खानदेश भागामधील जळगाव, नाशिक, धुळे आदी जिल्ह्यांमधून तसेच कर्नाटक, तेलंगणा येथील शेतकऱ्यांनी प्रदर्शन स्थळी मोठी गर्दी केली होती. या प्रदर्शनास माजी महसूल मंत्री मा. श्री. एकनाथ खडसे यांनी भेट दिली. त्यांचे स्वागत ट्रस्टचे चेअरमन मा. श्री. राजेंद्रदादा पवार यांनी केले. यावेळी मा. खडसे यांनी प्रक्षेत्रावरील विविध दालनांना भेटी देत आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची माहिती घेतली. सोलर पॉलीहाउस, एआय आधारित कांदा, ऊस, द्राक्षे, डाळिंब प्रात्यक्षिके तसेच जनावरांचे प्रदर्शन या दालनांना त्यांनी भेटी दिल्या. कर्नाटक राज्याचे कृषी सहसंचालक, कृषी विज्ञान केंद्र (बेळगाव) येथील प्रमुख अधिकारी व शेतकरी यांनी देखील प्रदर्शनास भेट देत विविध तंत्रज्ञानाची माहिती घेतली. तसेच माजी कृषी व रेशीम आयुक्त, तेलंगणा राज्य श्री. व्यंकट राम रेड्डी यांनी देखील प्रदर्शनास भेट दिली. प्रदर्शनातील बिना आवाजाचे इलेक्ट्रिक (EV) ट्रॅक्टर हे शेतकऱ्यांचे विशेष आकर्षण ठरले. आंतरमशागत, नांगरणी, रोटावेटर आदी कामांसाठी उपयुक्त असलेल्या २७ व ३२ अश्वशक्तीच्या ट्रॅक्टरची माहिती घेण्यासाठी शेतकरी मोठ्या संख्येने गर्दी करताना दिसून आले. डिझेलची आवश्यकता नसल्याने हे ट्रॅक्टर एका चार्जिंगमध्ये सुमारे ४ तास कार्यक्षम राहतात. केवळ रु. २३०/- इतक्या कमी खर्चात चार्जिंग होत असल्याने शेतकऱ्यांचा या तंत्रज्ञानाकडे विशेष ओढा दिसून आला. ज्ञानवर्धक, तंत्रज्ञानाधारित व अनुभवसमृद्ध ठरणारे हे कृषी प्रदर्शन शेतकऱ्यांना आधुनिक, किफायतशीर व शाश्वत शेतीच्या दिशेने मार्गदर्शन करणारे ठरत आहे. सदर कृषी प्रदर्शन शनिवार, दि. २४ जानेवारी २०२६ पर्यंत सुरू राहणार आहे.

### नगरसेवक अतुल नारायण तरवडे यांचा प्रभाग 41 साठी विकास आराखडा

बारामती (दैनिक संध्या) : नुकत्याच पार पडलेल्या पुणे महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक ४१ मधून श्री. अतुल नारायण तरवडे यांनी भरघोस मतांनी विजय मिळवला आहे. त्यांच्या निवडीमुळे विकासाभिमुख, दूरदृष्टी असलेले नेतृत्व नगरसेवक म्हणून प्रभागाला लाभले असल्याची भावना नागरिकांत व्यक्त होत आहे. निवडणुकीनंतर अतुल तरवडे यांनी प्रभागातील मूलभूत समस्या लक्षात घेऊन सर्वांगीण विकासाचा स्पष्ट आणि ठोस आराखडा जाहीर केला आहे. वेगाने वाढणाऱ्या प्रभाग ४१ मध्ये वाहतूक, आरोग्य, शिक्षण, पाणीपुरवठा, पर्यावरण व नागरी सुविधांमध्ये दीर्घकालीन आणि शाश्वत उपाययोजना राबवण्याचा त्यांचा मानस आहे. ससाणेनगर–महंमदवाडी रोडवरील रेल्वे क्रॉसिंगवर उड्डाणपूल उभारून वाहतूक कोंडी कायमस्वरूपी दूर करण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला आहे. श्रीराम चौक येथे होळकरवाडी व तरवडे वस्ती–महंमदवाडी दिशेला जाण्यासाठी अंडरपास उभारून चौक ट्रॅफिकमुक्त करण्याचे नियोजन आहे. कड नगर चौक–होले वस्ती–उंड्री परिसर हा शाळा व महाविद्यालयांचा केंद्रबिंदू असल्याने, भुयारी मार्ग व ग्रेड सेपरेटरद्वारे वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी ठोस प्रयत्न करण्यात येणार आहेत. तसेच प्रभाग क्रमांक ४१ मधील सर्व डी.पी. रस्त्यांचा सर्वांगीण विकास करण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे. नागरिकांना दर्जेदार, सुलभ व परवडणाऱ्या आरोग्य सेवा उपलब्ध व्हाव्यात यासाठी सर्वे नंबर ३६ येथे PPP मॉडेलवर १०० बेड्सचे सुसज्ज रुग्णालय उभारण्याचा प्रस्ताव आहे. यासोबतच आधुनिक सुविधांनी युक्त आरोग्य केंद्र उभारून स्थानिक पातळीवर उपचार सुविधा बळकट करण्यावर भर दिला जाणार आहे. प्रभागात पुणे महानगरपालिकेच्या अत्याधुनिक इंग्रजी व मराठी माध्यमांच्या शाळा उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे. शाळांसमोर, प्रमुख चौकांमध्ये तसेच वर्दळीच्या ठिकाणी हाय-टेक सीसीटीव्ही कॅमेरे बसवून सुरक्षित परिसर निर्माण करण्याचा मानस आहे. प्रभागातील सर्व सोसायट्या टँकरमुक्त करून २४×७ पाणीपुरवठा सुनिश्चित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. ड्रेनेजच्या पाण्याचे शुद्धीकरण व पंपिंग करून त्याचा पुनर्वापर उद्यानांसाठी केला जाणार आहे. तसेच प्रभागातील ओढ्याचा सुयोग्य वापर करून ज्येष्ठ नागरिकांसाठी आधुनिक 'नाला गार्डन' विकसित करण्याचा प्रस्ताव आहे. ॲमेनिटी स्पेसचा नियोजनबद्ध वापर करून नाना–नानी पार्क, विरंगुळा केंद्र, आरोग्य केंद्र, अग्निशामक केंद्र यांसारख्या समाजोपयोगी सुविधा उभारल्या जाणार आहेत. पथारी व्यवसायिकांमुळे होणारी वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी त्यांना पर्यायी व नियोजित जागा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सार्वजनिक ठिकाणी स्वच्छ व सुरक्षित महिला व पुरुष शौचालयांची उभारणीही प्रस्तावित आहे. काळेपडळ येथे उच्च दर्जाची विद्युतदाहिनी उभारण्यात येणार आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने कचरा मुक्त परिसर घडवण्यावर भर दिला जाणार आहे. मोकाट जनावरांचा प्रश्न सोडवण्यासाठी ठोस उपाययोजना राबवण्यात येणार असून, परिसरातील धोकादायक विद्युत वाहिन्या भूमिगत करून नागरिकांची सुरक्षितता वाढवली जाणार आहे. नागरिकांनी दिलेल्या भरघोस पाठिंब्याला विकासकामांच्या माध्यमातून न्याय देण्याचा निर्धार नगरसेवक अतुल नारायण तरवडे यांनी व्यक्त केला असून, प्रभाग क्रमांक ४१ ला आदर्श आणि विकसित प्रभाग बनवण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# असोसिएशन ऑफ स्पाईन सर्जन्स ऑफ इंडियाच्या परिषदेचे आयोजन

पुणे (दै. संध्या) :




पुणे असोसिएशन ऑफ स्पाईन सर्जन्स (पीएएसएस) तर्फे असोसिएशन ऑफ स्पाईन सर्जन्स ऑफ इंडिया (एएसएसआय) च्या 39 व्या वार्षिक परिषदेचे आयोजन करण्यात आले. ही परिषद 22 ते 25 जानेवारी 2026 दरम्यान पुण्यातील जे.डब्ल्यू मॅरियट हॉटेलमध्ये पार पडणार आहे.

एएसएसआयकॉन 2026 परिषदेच्या आयोजन समितीचे सचिव आणि संचेती हॉस्पिटलच्या स्पाईन आणि न्युरोसायन्स विभागाचे प्रमुख डॉ.शैलेश हदगावकर म्हणाले की, एएसएसआयकॉन 2026 मधील एक महत्त्वाची बाब म्हणजे यामध्ये अमेरिकन स्कोलिओसिस रिसर्च सोसायटी,ब्रिटिश असोसिएशन ऑफ स्पाईन सर्जन्स - बीएएसएस, कोरियन मिनिमली इनव्हेझिव्ह स्पाईन सोसायटी - केओएमआयएसएस, सिंगापूर असोसिएशन ऑफ स्पाईन सोसायटी ॲन्ड एओ स्पाईन - अ ग्लोबल ॲकॅडेमिक कम्युनिटी फॉर स्पाईन केअर यांसारख्या पाच प्रतिष्ठित स्पाईन सर्जन्सच्या संघटना तसेच नेपाळ व श्रीलंका या देशातील प्रतिनिधी भारतात प्रथमच एकत्र येणार आहेत.

आयोजन समितीचे अध्यक्ष डॉ.राजेश पारसनीस म्हणाले की, या परिषदेमध्ये आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय स्तरावरील तज्ञ एकत्र येणार असून सुमारे 1200 स्पाईन सर्जन्स सहभागी होण्याची अपेक्षा आहे. या परिषदेत मणक्याशी संबंधित विविध समस्या,विकृती त्याचे आधुनिक पध्दतीने निदान,उपचार यांसह अनेक शैक्षणिक, तांत्रिक व वैज्ञानिक चर्चासत्रे,शोधनिबंध स्पर्धा,प्रश्नमंजुषा,टेडटॉक्स,बीजभाषणे असे अनेक कार्यक्रम पार पडतील.

पुणे असोसिएशन ऑफ स्पाईन सर्जन्स (पीएएसएस) चे खजिनदार डॉ.प्रद्युम्न पै रायतुरकर म्हणाले की,मानेचे दुखणे,कमरेचा त्रास,मणक्याच्या विविध समस्या,स्कोलिओसिससारख्या विकृती,रिव्हीजन स्पाईन समस्या,ऑस्टिओपोरोसिस, लहान मुलांमधील मणक्याच्या समस्या आदी विषयांवर या परिषदेत चर्चा व मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

असोसिएशन ऑफ स्पाईन सर्जन्स ऑफ इंडियाचे अध्यक्ष डॉ.एस.के.श्रीवास्तव म्हणाले की, ही परिषद मणक्याच्या समस्यांसाठी शस्त्रक्रिया न करता दिल्या जाणाऱ्या पारंपरिक उपचार पध्दतींचा तसेच मणक्याच्या समस्यांवर उपचार करण्यासाठी अत्याधुनिक उपचार व कार्यप्रणालींचा एक उत्कृष्ट मिलाफ ठरणार आहे.

असोसिएशन ऑफ स्पाईन सर्जन्स ऑफ इंडियाचे सचिव डॉ.अप्पाजी कृष्णन म्हणाले,या परिषदेत रोबोटिक स्पाईन शस्त्रक्रिया,नेव्हिगेशन-आधारित स्पाईन शस्त्रक्रिया आणि एंडोस्कोपिक स्पाईन शस्त्रक्रिया यांसारख्या मणक्याच्या शस्त्रक्रियांमधील अत्याधुनिक प्रगत तंत्रांचा समावेश असेल. डॉ.शैलेश हदगावकर पुढे म्हणाले की, प्रख्यात तज्ञांच्या नेतृत्वाखालील विविध एएसएसआय अभ्यासगट अनेक विषयांवर मार्गदर्शन करतील. यामुळे तरूण पिढीतील मणका शल्यचिकित्सकांना उपचार कार्यप्रणाली तयार करण्याबाबत मार्गदर्शन मिळेल,तसेच सध्या कार्यरत असलेल्या अनेक अनुभवी शल्यचिकित्सकांकडून नवीन संकल्पना समजून घेण्यास मदत होईल.

## पिंपरी-चिंचवड महानगरपालिका स्पर्धामार्गावरील शाळा बंद

पुणे (दै. संध्या) :

पुणे ग्रँड चॅलेंज टूर-२०२६ आंतरराष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेच्या अनुषंगाने चौथ्या टप्प्याच्याअनुषंगाने पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील स्पर्धा मार्गावरील सर्व सरकारी व खाजगी शाळा २३ जानेवारी रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत सुरु ठेवाव्यात; त्यानंतर शाळा बंद करण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष जितेंद्र डूडी यांनी जारी केले आहेत. टप्पा क्रमांक चार अंतर्गत छत्रपती शिवाजी स्टेडियम, बालेवाडी येथून स्पर्धेला सुरुवात होणार असून ती पुणे शहरहद्दीत जावून परत राजीव गांधी ब्रिजमार्गे पिंपरी चिंचवड आयुक्तालयाच्या हद्दीत प्रवेश करुन ती सांगवी, वाकड, निगडी, त्रिवणीनगर, भोसरी, चिखली, पिंपरी काळेवाडी परिसरातून फिरुन परत राजीव गांधी ब्रिज मार्गे पुणे शहर हद्दीत प्रवेश करणार आहे.

ही स्पर्धा सुरळीत व सुरक्षितपणे पार पडणेकरीता तसेच नागरिकांची होणारी गैरसोय टाळणेकरिता स्पर्धा मार्गावर सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश करण्यास मनाई करण्यात आलेली असून वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात आलेली आहे.

विद्यार्थ्यांची होणारी गैरसोय टाळण्याकरीता स्पर्धा मार्गावरील सांगवी, वाकड, रावेत, ताथवडे, पुनावळे, निगडी प्राधिकरण, इंद्रायणीनगर, चिंचवड एम.आय.डी.सी, चिखली, काळेवाडी, भोसरी एम.आय.डी.सी., यशवंतनगर पिपरी, त्रिवेणीनगर या परिसरातील सर्व शासकीय व खाजगी शाळा दुपारी १२ वाजेनंतर बंद करण्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

## अमेझॉनकडून भारतात नवे स्मार्ट डिस्प्ले दाखल



मुंबई (दै. संध्या) :

अमेझॉनने भारतात आपले नवे इको शो ११ आणि चौथ्या पिढीतील इको शो ८ हे स्मार्ट डिस्प्ले सादर केले आहेत. घरगुती वापर अधिक सुलभ आणि स्वयंचलित करण्याच्या दृष्टीने ही उपकरणे विकसित करण्यात आली असून, त्यामध्ये प्रगत संवेदक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे.

नव्या इको शो मालिकेत ऑम्निसेन्स या सानुकूल संवेदक प्रणालीचा समावेश आहे. उपस्थिती, हालचाल आणि तापमान यांचा अभ्यास करून घरातील दिवे, तापमान व्यवस्था तसेच दैनंदिन दिनक्रम आपोआप जुळवून देण्याची क्षमता या उपकरणांमध्ये आहे.

या स्मार्ट डिस्प्लेंमध्ये पूर्णपणे नवीन श्राव्य रचना देण्यात आली आहे. समोरील बाजूने आवाज देणारे स्टीरिओ स्पीकर्स आणि खास तयार केलेले वूफर्स यामुळे संपूर्ण खोली भरून टाकणारा अवकाशीय आवाज अनुभवता येतो.

इको शो ११ मध्ये अकरा इंचांचा संपूर्ण उच्च दर्जाचा पडदा असून, इको शो ८ मध्ये साडेआठ इंचांचा उच्च दर्जाचा पडदा देण्यात आला आहे. टोकापासून टोकापर्यंत काच असलेला पडदा, पातळ कडा आणि आटोपशीर रचना यामुळे पाहण्याचा भाग अधिक मोठा मिळतो.

ही उपकरणे घरातील स्मार्ट साधनांचे नियंत्रण, दिनक्रम निश्चिती, दृश्य-श्राव्य सामग्रीचा आनंद, दिनदर्शिका व खरेदी यादीचे व्यवस्थापन तसेच पाककृती शोधण्यासाठी उपयुक्त ठरतात. स्पर्श नियंत्रणासोबतच आवाजाच्या आदेशांद्वारेही ही सर्व कामे करता येतात.

अमेझॉन उपकरणे भारताचे संचालक दिलीप आर. एस. यांनी सांगितले की, "कुटुंबाचे नियोजन, घराचे व्यवस्थापन किंवा दैनंदिन धावपळीत मदत करण्यासाठी ही उपकरणे तयार करण्यात आली आहेत. ग्राहकांच्या जीवनशैलीशी सहज जुळणारी आणि त्यांना अधिक संघटित ठेवणारी ही साधने आहेत."

प्रगत गृह स्वयंचलनाची सुविधा

या उपकरणांमध्ये वेगवान कार्यक्षमतेसाठी खास तयार केलेली एझेड थ्री प्रो चिप देण्यात आली आहे. विविध संवेदकांच्या साहाय्याने व्यक्तीनुरूप आणि सहाय्यकारी अनुभव मिळतो. खोलीत कोणी प्रवेश करताच दिवे आपोआप लागणे किंवा तापमान ठरावीक पातळीवर पोहोचताच यंत्रणा सुरू होणे असे स्वयंचलित प्रतिसाद शक्य होतात.

**खासगीपणाला प्राधान्य**

या उपकरणांमध्ये मायक्रोफोन बंद करण्याचे बटण, कॅमेरा नियंत्रण आणि आवाज नोंदी पाहण्याची व हटवण्याची सुविधा देण्यात आली आहे. इको शो ११ हे ग्रॅफाइट आणि हिमश्वेत रंगांत २६ हजार ९९९ रुपयांना, तर इको शो ८ हे ग्रॅफाइट आणि हिमश्वेत रंगांत २३ हजार ९९९ रुपयांना उपलब्ध आहे. ही उपकरणे अमेझॉन संकेतस्थळ, फ्लिपकार्ट तसेच रिलायन्स डिजिटल आणि क्रोमा या दुकानांमध्ये विक्रीसाठी उपलब्ध आहेत. घरगुती स्वयंचलन आणि मनोरंजनाचा अनुभव अधिक समृद्ध करण्याच्या दिशेने अमेझॉनने टाकलेले हे नवे पाऊल ठरणार आहे.

## टोयोटा किर्लोस्कर मोटरने लॉन्च केली ऑल-इलेक्ट्रिक अर्बन क्रूझर एबेला

### वेळ आली आहे इलेक्ट्रिक मोबिलिटीची नवीन व्याख्या अनुभवण्याची

मुंबई (दै. संध्या) :




टोयोटा किर्लोस्कर मोटर (TKM) ने आज ऑल-इलेक्ट्रिक अर्बन क्रूझर एबेला लॉन्च करण्याची घोषणा केली. अशाप्रकारे टोयोटाने भारताच्या बॅटरी इलेक्ट्रिक वाहन सेगमेन्टमध्ये पदार्पण केले आहे. इलेक्ट्रिफाईड मोबिलिटीत टोयोटाच्या जागतिक नैपुण्यासह, ऑल-इलेक्ट्रिक अर्बन क्रूझर एबेलामध्ये बोल्ड SUV स्टाइलिंग, प्रीमियम केबिन अनुभव तसेच आत प्रशस्त जागा, प्रगत टेक्नॉलॉजी आणि स्मूद, विश्वसनीय इलेक्ट्रिक परफॉर्मन्सची खात्री आहे. अर्बन SUV संकल्पनेतून जन्मलेली ऑल-इलेक्ट्रिक अर्बन क्रूझर एबेला, टोयोटाच्या मल्टीपाथ दृष्टिकोनास पुढे घेऊन जाण्याच्या दिशेने उचललेले एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे, जे ग्राहकांना इलेक्ट्रिफाईड पॉवरट्रेन टेक्नॉलॉजीचे अधिक पर्याय देते आणि भारताच्या एनर्जी सिक्युरिटी आणि डीकार्बनायझेशनच्या लक्ष्यास पाठिंबा देते. प्रस्तुत नवीन ऑफरिंगबाबत टिप्पणी करताना टोयोटा किर्लोस्कर मोटरचे अध्यक्ष, मॅनिजिंग डायरेक्टर आणि चीफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसर श्री. मसाकाझू योशिमुरा म्हणाले, "ऑल-इलेक्ट्रिक अर्बन क्रूझर एबेलाचे लॉन्चिंग हे आमच्या मल्टीपाथवे दृष्टिकोनास पुढे नेण्याच्या दिशेतील एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. आमचे लक्ष्य सर्वांना सोबत घेऊन कार्बन न्यूट्रलिटीत योगदान देण्याचे आहे. आता, भारतात ऑल-इलेक्ट्रिक अर्बन क्रूझर एबेलाच्या लॉन्चसह आम्ही हरित मोबिलिटीच्या दिशेने होणाऱ्या भारताच्या प्रवासात आमचे समर्थन अधिक मजबूत करण्याबाबत वचनबद्ध आहोत. आमची आकर्षक उत्पादन श्रेणी, टेक्नॉलॉजी लीडरशिप, सशक्त आफ्टर-सेल्स सर्व्हिस आणि डीलरशिप नेटवर्कसह, आम्ही सर्वांना मोबिलिटीचे स्वातंत्र्य देत आपले शाश्वत मोबिलिटीचे लक्ष्य प्राप्त करू इच्छितो."

या प्रसंगी उपस्थित असलेले टोयोटा किर्लोस्कर मोटरचे डेप्युटी मॅनिजिंग डायरेक्टर, श्री. तादाशी असाझुमा म्हणाले, "इलेक्ट्रिफाईड टेक्नॉलॉजीत तीन दशकांच्या जागतिक नैपुण्यासह टोयोटाने वेगवेगळ्या मोबिलिटी गरजा पूर्ण करण्यासाठी निरंतर फोकस्ड इनोव्हेशनमध्ये गुंतवणूक केली आहे. परिणामी, जगभरात आमच्या ग्राहकांनी आजवर आमच्या 38 मिलियन इलेक्ट्रिफाईड गाड्यांसह 197 मिलियन टनपेक्षा जास्त कार्बन डायऑक्साइड ($CO_2$) चे उत्सर्जन होण्यापासून वाचवले आहे.

या प्रगतीच्या मुळाशी आमचे मास हॅपीनेसचे तत्त्वज्ञान आहे आणि त्याचा पाया कार्बन न्यूट्रलिटीचा आहे. याचा उपयोग आम्हाला टोयोटा किर्लोस्कर मोटरच्या पहिल्या BEV, ऑल-इलेक्ट्रिक अर्बन क्रूझर एबेलाच्या निर्मितीत झाला आहे. आमचा प्री-लॉन्च रेडीनेस उत्पादनाच्या बराच पुढे आहे, जो हे सुनिश्चित करतो की, ग्राहकांना टोयोटाचे जागतिक मानक आणि भारतात भविष्य-तत्पर आणि शाश्वत मोबिलिटीच्या आमच्या व्हिजनशी सुसंगत एक निर्वेध आणि चिंता-मुक्त मालकीचा अनुभव मिळेल."

## इन्सुलिन उपचारांच्या भावनिक परिणामांवर मात करणे

नवी दिल्ली (दै. संध्या) :

■ भारतातील मधुमेहाच्या व्यवस्थापनातील अडथळे दूर करण्यासाठी तज्ञांनी नाविन्यपूर्ण जनजागृतीचे आवाहन केले आहे

बॉलिवूड अभिनेत्री रवीना टंडन यांच्या साथीने सिप्लाने #InhaleTheChange नावाचा देशव्यापी जनजागृती उपक्रम सुरू केला असून, इन्सुलिन थेरपीशी संबंधित भावनिक आणि वर्तणुकीतील अडथळ्यांवर मात करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. भारतासमोरील सर्वात गंभीर सार्वजनिक आरोग्य आव्हानांमध्ये मधुमेहाची गणना केली जाते, मधुमेहामुळे दीर्घकालीन आजारपण आणि लक्षणीय जीवितहानी याचा सामना करावा लागतो. 10 कोटींहून अधिक भारतीय या आजाराने ग्रस्त असल्याने देशाला अनेकदा 'जगाची मधुमेह राजधानी' म्हटले जाते, अशा परिस्थितीत, केवळ 27.5% लोकांना त्यांच्या स्थितीची जाणीव आहे आणि फक्त 7% लोकांची रक्तातील साखर नियंत्रणात आहे, ही बाब खरोखरच चिंताजनक आहे [1], [2] या आकड्यांमुळे वैद्यकीय आव्हानांचा खडतर मार्ग तर दिसून येतोच पण त्याचसोबत भीती, सामाजिक लांच्छन किंवा आपल्या स्थितीबद्दल आणि उपलब्ध पर्यायांबद्दलच्या माहितीच्या अभावामुळे उपचारांमध्ये चालढकल करणाऱ्या किंवा उपचार बंद करणाऱ्या रुग्णांच्या दैनंदिन संघर्षांवरही प्रकाश टाकतात. या वास्तविक जीवनातील अडथळ्यांना सामोरे जाण्याची गरज अधोरेखित करताना, डॉ. हर्षल एकतपुरे, सल्लागार एंडोक्राइनोलॉजिस्ट आणि मधुमेहतज्ज्ञ, म्हणाले: "सोपे आणि अधिक सोयीस्कर पर्याय उपलब्ध करून देताना, या चिंता ऐकून घेण्यासाठी आणि त्यांचे सुलभ निराकरण करण्यासाठी जागा निर्माण करणे आवश्यक आहे..4 #InhaleTheChange सारखे रुग्ण-केंद्रित शिक्षणाला क्लिनिकल माहितीसोबत जोडणारे जनजागृती उपक्रम उपचारांबद्दलची भीती कमी करण्यात आणि उपचारांवर विश्वास निर्माण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावू शकतात.

# ब्लेंडर्स प्राईडने झेनिथ ब्लॅक एडिशनच्या सुरुवातीची केली घोषणा

### केवळ दहा लाख बॉटल्सची मर्यादित निर्मीती, जिथे बोल्ड ब्लॅक डिझाइन आणि आयकॉनिक वारसा प्रीमियम व्हिस्कीच्या उत्तमतेला अधिकच उत्तम बनवतो

नवी दिल्ली (दै. संध्या) :




भारताच्या प्रीमियम व्हिस्की विभागातील अग्रेसर असलेल्या ब्लेंडर्स प्राइडने, ब्लेंडर्स प्राइड झेनिथ ब्लॅक एडिशनच्या सुरुवातीची घोषणा केली आहे. ही एक मर्यादित-एडिशन असून, यात आकर्षक काळ्या रंगाची स्टाइल आणि आकर्षक ब्लेंडर्स प्राइडचे मिश्रण असून त्याआधारे एक खरोखरच वैशिष्ट्यपूर्ण अनुभव निर्माण करण्यात आला आहे.

उत्तम आरामदायीपणा आणि वेगळेपणाचे प्रतीक असलेल्या आकर्षक काळ्या डिझाइनमध्ये सादर केलेली, झेनिथ ब्लॅक एडिशन विशेषतः अशा व्यक्तींसाठी तयार करण्यात आली आहे जी व्हिस्कीची जाणकार असून – लाखात एक असेल. केवळ दहा लाख बॉटल्स उपलब्ध असल्याने, ही एडिशन जितकी सुंदर आहे, तितकीच दुर्मिळही आहे.

आरामदायीपणाच्या या जगात, काळा रंग हा केवळ रंगच नाही तर आणखी बरेच काही दर्शवतो. काळा रंग म्हणजे वृत्ती आहे, तो एक प्रतिष्ठा आणि सामर्थ्याची झलक आहे. ब्लेंडर्स प्राइडशी दीर्घकाळापासून संबंधित असलेला काळा रंग, आता एका नाविन्यपूर्ण डिझाइनमध्ये केंद्रस्थानी आहे, ज्यामुळे प्रीमियम व्हिस्की आणखीणच आकर्षक बनते. ही एडिशन केवळ नवीन पॅकेजिंग नव्हे; तर स्टाईलचे एक्सप्रेशन आहे, ही अशा लोकांसाठी आहे जे ट्रेंडच्या मागे धावत नाहीत, तर स्वतःच ट्रेंड निर्माण करतात.

पर्नोड रिकार्ड इंडियाच्या CMO देवश्री दासगुप्ता म्हणाल्या, "ब्लेंडर्स प्राइड भारतात प्रीमियम व्हिस्कीचे बेंचमार्क सातत्याने नवनवीन पद्धतीने तयार करत असते. झेनिथ ब्लॅक एडिशनच्या सुरुवातीमुळे हा ब्रँडचा आतापर्यंतचा सर्वात उत्कृष्ट आविष्कार समोर आला आहे. ही एक अशी उत्क्रांती आहे, जी व्हिस्कीच्या वारस्याला धाडसी नवीन डिझाइन स्टाईलमध्ये बदलते. या वर्षी, ब्लेंडर्स प्राइड महत्त्वाकांक्षा, वेगळेपणा आणि कारागिरीचा गौरव करणाऱ्या सौंदर्यदृष्टीतून आपली मुलभूत मूल्ये जागृत करत आहे. केवळ दहा लाख बॉटल्सपुरते मर्यादित असलेली झेनिथ ब्लॅक एडिशन अशा व्यक्तींसाठी तयार केली गेली आहे, ज्या केवळ उत्तमतेचे कौतुकच करत नाहीत, तर स्वतःमध्ये ती उत्तमता आणण्याचा प्रयत्न करतात."

ब्लेंडर्स प्राइड झेनिथ ब्लॅक एडिशन अशांसाठी आहे जे नेहमी वेगळे काहीतरी शोधत असतात – ही एडिशन असा एक असाधारण अनुभव आहे जो गुणवत्तेशी तडजोड न करता खरोखर काहीतरी देतो.

संपूर्ण भारतात सुरूवात होणार असलेली ब्लेंडर्स प्राइड झेनिथ ब्लॅक एडिशन सध्या मात्र केवळ निवडक स्टोअर्समध्येच उपलब्ध आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### 25 जानेवारीला जागतिक सूर्यनमस्कार महोत्सव..!

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड महापालिका व आशाकिरण सोशल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने १२ वा जागतिक सूर्यनमस्कार महोत्सव रविवार, २५ जानेवारी २०२६ रोजी मोरया गोसावी क्रीडांगण, केशवनगर, चिंचवडगाव येथे आयोजित करण्यात आला आहे. महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपायुक्त पंकज पाटील, ममता शिंदे यांच्या अधिपत्याखाली हा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांमध्ये योगसाधना, शारीरिक स्वास्थ्य, मानसिक स्थैर्य तसेच शिस्तबद्ध जीवनशैलीचा संस्कार रुजवणे या उद्देशाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमात पिंपरी चिंचवड महापालिका शाळेतील व खासगी शाळेतील इयत्ता पाचवी ते नववीपर्यंतचे विद्यार्थी सहभागी होणार आहेत, तसेच विविध राजकीय क्षेत्रातील मान्यवर व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. या जागतिक सूर्यनमस्कार महोत्सवासाठी नावनोंदणी २२ जानेवारी ते २४ जानेवारी २०२६ या कालावधीत मोरया गोसावी क्रीडांगण, केशवनगर, चिंचवडगाव येथे दररोज सायंकाळी ४.०० ते ६.०० या वेळेत करता येणार आहे. तसेच ९४२२२३१५६९ या व्हॉट्सअॅप मोबाईल क्रमांकावर देखील नावनोंदणी करता येईल. नावनोंदणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर २५ जानेवारी २०२६ रोजी प्रत्यक्ष मैदानावर केशवनगर येथील मोरया गोसावी क्रीडांगण येथे सकाळी ७.३० वाजता मुख्य सूर्यनमस्कार महोत्सवाला सुरुवात होणार आहे.



### आता तरी तोंडे उघडा, चुकीच्या कामाविरोधात बोला : अजित पवारांचा इशारा

■ पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीतील पराभवानंतर अजित पवारांची राष्ट्रवादीच्या नवनिर्वाचित नगरसेवकांना कडक सूचना

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीत आजी-माजी आमदारांनी उमेदवारांचा प्रचार केला नाही. काही जण निवडणूक न लढता मैदानाच्या बाहेर राहणे चुकीचे होते. आता तरी तोंडे उघडा, चुकीच्या कामाविरोधात आक्रमकपणे बोला, अशी सक्त सूचना राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नवनिर्वाचित नगरसेवकांच्या बैठकीत केली आहे. महापालिकेची निवडणूक उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रतिष्ठेची केली होती. त्यांनी स्वतः उमेदवार ठरविण्यापासून प्रचाराची धुरा सांभाळली. महापालिकेतील गैरकारभाराचे आरोप करीत भाजपाच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांना लक्ष्य केले होते. संपूर्ण शहर पिंजून काढत 15 पेक्षा अधिक जाहीर सभा घेतल्या. बैठका व मेळावा घेतल्या. त्यानंतरही राष्ट्रवादीला अपयश आले. 128 पैकी केवळ 37 नगरसेवक निवडून आले. पवार यांनी सोमवारी (दि.19) नवनिर्वाचित 37 नगरसेवकांची पुण्यात बैठक घेतली. निवडून आलेल्या नगरसेवकांचे अभिनंदन केले. निवडणुकीचा आढावा घेतला. पराभवावर चर्चा केली. नगरसेवकांना मार्गदर्शन केले. त्या वेळी ते बोलत होते. पवार म्हणाले की, निवडणूक प्रचारात आजी-माजी आमदारांनी उमेदवारांचा प्रचार केला नाही. काही जण निवडणूक न लढता मैदानाच्या बाहेर राहणे चुकीचे होते. स्थानिक पदाधिकारी चुकीच्या कारभाराविरोधात काहीच बोलले नाहीत. इतर उमेदवारांच्या प्रचारात दिसले नाहीत. आपल्या प्रभागातच गुंतून राहिले. आता, तरी तोंडे उघडा, चुकीच्या कामाविरोधात बोला, अशा सक्त सूचना पवार यांनी पदाधिकारी व नगरसेवकांना दिले आहेत. पहिल्यांदाच नगरसेवक झालेल्यांचे कौतूक करत पवार म्हणाले की, नवीन पिढी घडवायची आहे. जुन्या-जाणत्यांचे मार्गदर्शन घ्यावे. सभागृहाचे कामकाज समजून घ्या. महापालिका सभेला वेळेवर उपस्थित रहा. कामकाजात सहभाग घ्या. चुकीच्या कामाविरोधात आवाज उठवा. पक्षाच्या पराभवाने खचून जावू नका. जोमाने काम करा. मी तुमच्या पाठीशी उभा आहे, अशी ग्वाही त्यांनी नगरसेवकांना दिली.

### नागरिकांसाठी ऑनलाईन सेवा, GIS व ब्लॉकचेन तंत्रज्ञानाची सोय



■ घरबसल्या सेवा व सुरक्षित माहितीसाठी पीएमआरडीएने डिजिटल उपक्रम सुरू केले, नागरिकांकडून सकारात्मक प्रतिसाद

पिंपरी (दैनिक संध्या) : पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) नागरी सेवा अधिक सुलभ, पारदर्शक आणि तत्पर करण्यासाठी ऑनलाइन सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत. शहरी नियोजन अधिक अचूक व प्रभावी करण्यासाठी जीआयएस पोर्टल सुरू करण्यात आले असून, उपग्रह प्रतिमा व प्रगत जीआयएस तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विकास आराखडा, पूररेषा, जागांची सद्यस्थिती तसेच विविध विभागांची माहिती एकत्रित करण्यात येत आहे. त्यातच ब्लॉकचेन प्रणालीमुळे माहिती सुरक्षित, अपरिवर्तनीय ठेवली जात असून, माहितीची पडताळणी देखील सुलभ होईल, अशी माहिती पीएमआरडीएचे आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी दिली. या उपक्रमांमुळे नागरिकांचा वेळ व खर्च वाचणार असून, अनावश्यक कार्यालयीन फेऱ्यांना आळा बसला आहे. पीएमआरडीएने टीडीआर नोंदी सुरक्षित ठेवण्यासाठी ब्लॉकचेन प्रणाली कार्यान्वित केली आहे. ही प्रणाली बनावट कागदपत्रे व फसवणूक रोखण्यास मदत करणार असून, पुढील काही धोका टळणार असून, पारदर्शक, अपरिवर्तनीय आणि सुरक्षित स्वरूपात उपलब्ध आहेत. अॅमिनिटी प्लॉट्सच्या निर्मिती, विक्री व विकासप्रक्रियेत ब्लॉकचेन प्रणालीचा वापर करण्यात आला आहे. यामुळे नागरिकांना जमिनीच्या वास्तविक मालकीचा तपशील, सार्वजनिक सुविधांचा अंतिम विकास तसेच लिलाव करण्यात आलेल्या जमिनीशी संबंधित संपूर्ण माहिती पारदर्शकपणे उपलब्ध होईल. महानगराचे नियोजन अधिक अचूक व परिणामकारक करण्यासाठी जीआयएस पोर्टल विकसित करण्यात आले आहे. विकास आराखडा, पूररेषा, जागांची सद्यस्थिती तसेच विविध विभागांची माहिती एकत्रित करते. डिजिटल तंत्रज्ञानाचा नियोजनबद्ध वापर करून पीएमआरडीएने प्रशासन आणि नागरिक यांच्यातील अंतर लक्षणीयरीत्या कमी केले आहे. घरबसल्या सेवा ही संकल्पना प्रत्यक्षात यशस्वीपणे राबवण्यात आल्याबद्दल नागरिकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.

कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाच्या (भारतीय प्रशासकीय सेवेतील)

# अधिकाऱ्यांची सखी आंगण व निगडी कौशल्यम प्रकल्पास भेट

**महिला उद्योजकता व युवक कौशल्य विकासाला चालना देणाऱ्या उपक्रमांचे केले कौतुक**

पिंपरी (दै. संध्या) :

■ रावेत येथील महिला बचत गटांमार्फत चालविण्यात "सखी आंगण" प्रकल्पाचीही केली पाहणी



भारत सरकारच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाच्या सचिव देवाश्री मुखर्जी यांनी पुणे दौऱ्यादरम्यान पिंपरी चिंचवड शहरातील कौशल्य विकास, रोजगारनिर्मिती व महिला सक्षमीकरणाशी संबंधित विविध महत्त्वाकांक्षी प्रकल्पांना भेट दिली व माहिती घेतली.

या भेटीदरम्यान कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनीषा वर्मा, आयुक्त अमित सैनी, महाराष्ट्र राज्याच्या व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या संचालक माधवी सरदेशमुख, प्रादेशिक संचालक चेंगोटी मूर्ती यांच्यासह पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, समाज विकास विभागाच्या उप आयुक्त ममता शिंदे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक,प्रशासन अधिकारी अनिता बाविस्कर तसेच स्वयंसेवी महिला बचत गटातील महिला आणि परिसरातील सामाजिक कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

यावेळी केंद्र व राज्य शासनाच्या अधिकाऱ्यांनी महापालिकेच्या उपक्रमांची प्रत्यक्ष पाहणी करून माहिती घेतली. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या समाज विकास विभाग व लाईटहाऊस फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या निगडी येथील 'कौशल्यम' (लाईटहाऊस) प्रकल्पास अधिकाऱ्यांनी भेट दिली. या केंद्रामध्ये तरुण व महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या कौशल्य प्रशिक्षण अभ्यासक्रमांची माहिती घेण्यात आली. यावेळी प्रशिक्षणार्थी युवक व महिलांशी संवाद साधत त्यांनी प्रकल्पाच्या माध्यमातून मिळणाऱ्या रोजगाराच्या संधी, कौशल्यविकासाची दिशा व आत्मविश्वास वृद्धीबाबत अनुभव जाणून घेतले.

प्रशिक्षणार्थींनी या प्रकल्पामुळे उद्योगांच्या गरजांनुसार कौशल्य प्रशिक्षण मिळाल्याने नोकरीच्या संधी उपलब्ध झाल्याचे सांगितले. विशेषतः विवाहानंतर करिअरमध्ये आलेल्या अडचणींवर मात करून पुन्हा व्यावसायिक जीवनात प्रवेश करण्यासाठी या प्रकल्पाने मोठी प्रेरणा दिल्याचे महिलांनी नमूद केले. यावेळी अधिकाऱ्यांनी प्रशिक्षणार्थींच्या प्रगतीचे कौतुक करत कौशल्याधारित रोजगार निर्मितीच्या दृष्टीने हा प्रकल्प प्रभावी ठरत असल्याचे मत व्यक्त केले.

> महापालिकेच्या समाज विकास विभागाच्या माध्यमातून राबविण्यात येणारे 'कौशल्यम' आणि 'सखी आंगण' हे उपक्रम केवळ प्रशिक्षण किंवा विक्रीपुरते मर्यादित नसून, रोजगारनिर्मिती व महिला उद्योजकता घडविणारे प्रभावी मॉडेल ठरत आहेत. उद्योगांच्या गरजांनुसार कौशल्य विकास, थेट बाजारपेठेपर्यंत पोहोच आणि आर्थिक स्वावलंबन यांचा एकत्रित विचार करून हे प्रकल्प राबविण्यात येत आहेत. केंद्र व राज्य शासनाच्या सहकार्याने अशा उपक्रमांचा विस्तार करून अधिकाधिक युवक व महिलांना सक्षम करण्यासाठी महापालिका प्रयत्नशील आहे.
>
> **- श्रावण हर्डीकर, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

यानंतर शिष्टमंडळाने आकुर्डी रेल्वे स्टेशनजवळील महिला बचत गटांमार्फत चालविण्यात येणाऱ्या 'सखी आंगण' या महत्त्वाकांक्षी प्रकल्पास भेट दिली. ४९ गाळ्यांच्या या संकुलामध्ये महिला बचत गटांकडून फूड व नॉन-फूड अशा दोन प्रवर्गांत विविध उत्पादनांची निर्मिती, प्रक्रिया, पॅकेजिंग व थेट विक्री केली जाते. या ठिकाणी नाश्ता व जेवणाचे खाद्यपदार्थ, पापड, लोणची, मसाले, तयार खाद्यपदार्थ, बेकरी उत्पादने, हस्तकला साहित्य, सजावटीच्या वस्तू, कापडी पिशव्या, अगरबत्ती तसेच सौंदर्यप्रसाधनांशी संबंधित वस्तूंची विक्री करण्यात येते.

महापालिकेच्या समाजविकास विभागाच्या वतीने राबविण्यात आलेल्या सखी आंगण प्रकल्पामुळे महिला बचत गटांना थेट ग्राहकांपर्यंत पोहोचण्याची संधी मिळत असून मध्यस्थांची साखळी टळल्याने महिलांना अधिक आर्थिक लाभ होत आहे.

केवळ विक्रीपुरते मर्यादित न राहता आर्थिक व्यवहार, विपणन, ग्राहक संवाद व व्यवसाय व्यवस्थापनाचे प्रत्यक्ष प्रशिक्षण महिलांना या प्रकल्पातून मिळत असल्याने अनेक महिला रोजगार देणाऱ्या उद्योजक म्हणून पुढे येत आहेत. त्यामुळे 'सखी आंगण' हा प्रकल्प महिला सक्षमीकरणाचे आदर्श मॉडेल ठरत असल्याचे मत यावेळी अधिकाऱ्यांनी व्यक्त केले.

## ७७ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाची १ कोटींची सायबर फसवणूक

पिंपरी (दै. संध्या) :

■ 'डिजिटल अटक'ची भीती दाखवून लूट

उद्योगनगरी पिंपरी-चिंचवड शहरात सायबर गुन्हेगारांनी सीबीआय अधिकारी असल्याचे भासवून ७७ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाची तब्बल १ कोटी रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. 'डिजिटल अटक'ची भीती दाखवून आरोपींनी ही रक्कम उकळल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी पिंपरी-चिंचवड सायबर पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. चिंचवड येथील शिवाजी पार्क परिसरात राहणारे अशोक कृष्णा सराफ (वय ७७) यांना काही अज्ञात व्यक्तींनी फोन केला. फोनवरून आरोपींनी स्वतःची ओळख प्रथम टेलिफोन विभागाचे अधिकारी, नंतर सर्व्हिलन्स अधिकारी आणि अखेरीस सीबीआय अधिकारी अशी करून दिली. त्यांनी सराफ यांना सांगितले की, त्यांच्या नावावरील कॅनरा बँकेच्या खात्याचा वापर नरेश गोयल यांच्यावरील ईडी कारवाईतील मनी लाँड्रिंग प्रकरणात झाला आहे. या प्रकरणात तात्काळ अटक होऊ शकते, अशी भीती दाखवून आरोपींनी सराफ यांचे मानसिक खच्चीकरण केले.

## आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेचे जल्लोषात स्वागत

पिंपरी (दै. संध्या) :



ढोल-ताशांचा निनाद, टाळ्यांचा गजर आणि उत्साहाची लाट अशा जल्लोषपूर्ण वातावरणात पिंपरी चिंचवडकरांनी 'बजाज पुणे ग्रँड टूर – २०२६' या आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेचे जल्लोषात स्वागत केले. वेग, शिस्त आणि खेळभावनेचा संगम असलेली ही स्पर्धा नागरिकांच्या डोळ्यांचे पारणे फेडणारी ठरली.

स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या सायकलपटूंचे पिंपरी चिंचवड शहरात आगमन होताच लक्ष्मी चौक ते आकुर्डी या मार्गावर ही स्पर्धा पाहण्यासाठी नागरिकांची हजारोंच्या संख्येने दुतर्फा गर्दी जमली होती. पिंपरी चिंचवड महापालिकेने या स्पर्धेच्या अनुषंगाने जय्यत तयारी करीत शहरातील प्रमुख मार्गांसह तसेच चौकांमध्ये ठिकठिकाणी फुलांची आकर्षक सजावट केली होती.

'बजाज पुणे ग्रँड टूर – २०२६' या आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेच्या पहिल्या टप्प्याला आज प्रचंड उत्साहात सुरुवात झाली. टी.सी.एस. सर्कल, हिंजवडी येथून सुरू झालेल्या या टप्प्याचा समारोप डॉ. डी. वाय. पाटील आंतरराष्ट्रीय इन्स्टिट्यूट, आकुर्डी, रावेत येथे झाला. याठिकाणी स्पर्धेच्या पहिल्या टप्प्यातील विजेत्यांचा सन्मान खासदार मेधा कुलकर्णी, आमदार उमा खापरे, अमित गोरखे, शंकर जगताप, पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, जिल्हाधिकारी डॉ. जितेंद्र डुडी यांच्या हस्ते करण्यात आला.

## पीसीसीओईआरचा 'एसएई इंडिया ई-बाहा २०२६' राष्ट्रीय स्पर्धेत प्रथम क्रमांक

**पीसीसीओईआरला ११ पदके आणि ३ लाख ६० हजार रुपये बक्षीस**

पिंपरी (दै. संध्या) :

सोसायटी ऑफ ऑटोमोटिव्ह इंजिनियर्स या संस्थेने पीथमपुर येथील "एसएई इंडिया ई - बाहा २०२६" या राष्ट्रीय स्पर्धेत पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) रावेत येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड रिचर्स च्या (पीसीसीओईआर) मेकॅनिकल विभागातील "टीम नॅशोर्न्स" ने दैदीप्यमान कामगिरी करीत एकूण ११ पदकांसह तीन लाख साठ हजार रुपयांचे पारितोषिक मिळवून देशात प्रथम क्रमांक पटकावला. या स्पर्धेत देशभरातून शंभरपेक्षा अधिक अभियांत्रिकी महाविद्यालयांनी भाग घेतला होता. पीसीसीओईआर च्या टीम नॅशोर्न्स ने टिकाऊपणा, उत्कृष्टतता, समग्र भौतिक गतिमान, निलंबन व संकर्षण अशा विविध विभागात प्रथम क्रमांक आणि स्टॅटिक, बौद्धिक, सीएइ या विभागांमध्ये तृतीय क्रमांक तसेच सर्वोत्कृष्ट पदार्पण पुरस्कार प्राप्त केला. पीसीसीओईआरच्या विद्यार्थ्यांनी या राष्ट्रीय स्पर्धेत पदार्पणातच राष्ट्रीय पातळीवरील प्रथम क्रमांक पटकावून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. या टीम मधील सर्व विद्यार्थी, त्यांचे मार्गदर्शक, प्राचार्य, समन्वयक यांनी एकत्रित पणे केलेले प्रयत्न आणि पीसीईटीच्या व्यवस्थापनाने उपलब्ध करून दिलेल्या पायाभूत सुविधांमुळे हा सुवर्ण क्षण पहायला मिळाला आहे असे गौरवउद्गार पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे यांनी यावेळी काढले. पीसीसीओईआर मधील विद्यार्थी कर्णधार सौरभ पाटील, उपकर्णधार महेंद्र कुंभार, चालक साजिद मुलानी, पृथ्वीराज पाटील, अखिलेश वांजपेय, देवेंद्र पाटील, ओंकार शेजवळ, धीरज पाटील, ऑस्टिन जॉर्ज, हेमंत पाटील, पार्थ पांदेकर, जय पगारे, रश्मीत गोयल, श्रीकृष्णा माने, विश्वजीत पाटील, प्रणव कांबळे, विश्वजीत कोल्हे, दिशांत पिपरे, श्रीरंग नायर, सोहम शेलार, आयुष पाटील, समरजीत तानपुरे, आदित्य माने, आणि ओम बडे या विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग घेतला होता. प्राचार्य डॉ. हरीश तिवारी, विभाग प्रमुख डॉ. गुलाब सिरसकर, प्रा. सुखदीप चौगुले, सुजित चौधरी यांनी मार्गदर्शन केले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीसीओईआर चे संचालक प्राचार्य डॉ. हरीश तिवारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## मावळ निवडणुकीपूर्वी पोलिस प्रशासन अलर्ट मोडवर

कामशेत (दै. संध्या) :

मावळमध्ये होऊ घातलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांचे वारे जोरात वाहू लागले आहे. निवडणुकांची रणधुमाळी सुरू झालेली असून, या काळात शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्याकरिता कामशेत पोलिस प्रशासनाने कंबर कसली असून, सर्व पोलिस प्रशासन अलर्ट मोडवर असल्याचे दिसत आहे. कामशेत पोलिस प्रशासनाने काळ्या काचा असलेल्या व काळ्या फिल्म लावलेल्या चारचाकी गाड्यांवर धडक कारवाई करीत चारचाकी गाड्यांची तपासणी सुरू केली आहे. या निवडणुकीच्या काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये, म्हणून पोलिस प्रशासनामार्फत विशेष खबरदारी घेण्यात येत आहे. विशेष म्हणजे अशा काळ्या काचा असलेल्या गाडीमध्ये कोण आहे ते कळत नाही. आरटीओ विभागाने अशा वाहनांवर व काळ्या काचांवर तसेच डार्क काळी फिल्म लावण्यावर सक्त मनाई आहे. काही चारचाकी मालक कायद्याचे उल्लंघन करताना दिसून येत आहेत. अशा बेजाबदार वाहनचालकांवर पोलिस प्रशासनाने कारवाई सुरू केली आहे.

कामशेत शहर हे अतिसंवेदनशील क्रमवारीत येते. यामुळे पोलिस प्रशासनाने अवैध गतिविधीवर बारीक लक्ष ठेवल्याचे दिसून येत आहे. मावळात व कामशेत शहरात इतर मार्गाने अमली पदार्थांचे साठे येऊ नयेत, याकरिता विशेष मोहीम राबविली जात आहे.

# "गुड गव्हर्नन्स" साठी क्षेत्रीय कार्यालयांची संख्या १० करा : आमदार शंकर जगताप

पिंपरी (दै. संध्या) :

■ प्रशासकीय कामात अधिक सुलभता, पारदर्शकता व गती देण्यासाठी भाजपा प्रयत्नशील

■ शहरातील लोकसंख्येच्या अनुषंगाने १० प्रभाग कार्यालयांची आवश्यकता



> आमदार शंकर जगताप म्हणाले, "पिंपरी-चिंचवड शहराचा विस्तार, लोकसंख्या वाढ आणि नागरिकांच्या दैनंदिन गरजा लक्षात घेता सध्याची ८ प्रभाग कार्यालयांची रचना अपुरी ठरत आहे. प्रत्येक कार्यालयावर प्रशासकीय कामांचा प्रचंड ताण असून त्यामुळे नागरिकांना वेळेत सेवा मिळण्यात अडचणी येत आहेत. प्रशासन अधिक लोकाभिमुख, पारदर्शक आणि गतिमान करण्यासाठी प्रभाग कार्यालयांची संख्या १० करणे ही काळाची गरज आहे. यामुळे सेवा विकेंद्रीकरण प्रभावी होईल, तक्रारींचे निराकरण जलद होईल आणि स्थानिक पातळीवर निर्णयप्रक्रिया सुलभ होईल.

देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या संकल्पनेतून "गुड गव्हर्नन्स" संसद ते ग्रामपंचायत राबविले जात आहे. याच अनुषंगाने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या माध्यमातून नागरिकांना मूलभूत सेवा सुविधांचा तात्काळ लाभ मिळावा. तक्रारींचे जागीच निराकरण व्हावे आणि दैनंदिन जीवन सुखकर व्हावे यासाठी भारतीय जनता पक्ष कटिबद्ध आहे. त्यामुळे शहरातील क्षेत्रीय कार्यालयांची संख्या ८ वरून १० करावी अशी मागणी आमदार शंकर जगताप यांनी केली आहे. याबाबत त्यांनी महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांना पत्र दिले आहे. महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांना दिलेल्या लेखी पत्रामध्ये आमदार शंकर जगताप यांनी म्हटले आहे, पिंपरी चिंचवड महापालिकेची निवडणूक नुकतीच पार पडली. शहरातील ३२ प्रभागातील एकूण मतदारसंख्या ही महापालिकेने प्रसिद्ध केलेल्या यादीनुसार १७ लाख १२ हजार १५१ मतदार आहेत. यामध्ये पुरुष मतदार ९ लाख ४ हजार ८१५ इतके आहेत तर ८ लाख ०७ हजार १०३ महिला मतदार आहेत. भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून संसद ते ग्रामपंचायत "गुड गव्हर्नन्स"ची संकल्पना राबवली जात आहे.

विविध सरकारी सेवांचे विकेंद्रीकरण करून नागरिकांना तात्काळ विविध सेवा मिळाव्या हा या संकल्पनेचा मुख्य उद्देश आहे असे सांगून आमदार जगताप म्हणाले, सध्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये एकूण ८ क्षेत्रीय कार्यालये कार्यरत आहेत. मात्र महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात मागील १० वर्षांत मोठ्या प्रमाणावर लोकसंख्यावाढ, नागरीकरण, नागरी सेवा व तक्रारींचे प्रमाणामध्ये लक्षणीय वाढ झालेली दिसून येते. विद्यमान ८ क्षेत्रीय कार्यालयांवर प्रशासकीय, तांत्रिक व सेवा-संबंधित कामाचा ताण मोठ्या प्रमाणात वाढल्याने प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयामागे येणारी लोकसंख्येनिहाय तक्रार निवारण व परवाना व इतर सेवा देण्यात विलंब होत आहे. स्थानिक पातळीवरील निर्णय प्रक्रियेत मर्यादेमुळे या प्रभाग कार्यालयाद्वारे आपण केलेल्या सेवा विकेंद्रीकरणाचा उद्देश पूर्णतः साध्य होत नाही.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील कलम २९ अ च्या अनुषंगाने १२ लाखांपेक्षा अधिक व २४ लाखांपर्यंत प्रभाग समित्यांची किमान संख्या ९ असून अतिरिक्त लोकसंख्येसाठी अतिरिक्त प्रभाग समित्या संख्या ३ लाखाच्या पटीत तर प्रभाग समित्यांची कमाल संख्या १३ असून त्या अनुषंगाने पिंपरी चिंचवडच्या लोकसंख्येच्या प्रमाणात, भौगोलिक विस्तार व प्रशासकीय सुलभतेचा विचार करता क्षेत्रीय कार्यालये संख्या ८ ऐवजी १० करणे आवश्यक आहे. म्हणून प्रभाग समित्यांची संख्या ८ वरून १० करण्यास तत्वतः मान्यता देण्यात यावी व त्यानुसार पुढील आवश्यक प्रशासकीय व संरचनात्मक कार्यवाही करण्याचे आदेश निर्गमित करण्यात यावेत असे आमदार जगताप यांनी पत्रात म्हटले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### एअरटेल आयपीटीव्ही सोबत रिपब्लिक डे वीकेंड खास बनवा

■ रिपब्लिक डेच्या दिवशी बघा देशभक्ती आणि थरारक चित्रपट एअरटेल आयपीटीव्हीवर

मुंबई (दैनिक संध्या) : रिपब्लिक डे च्या आठवड्याच्या सुट्टीत आता आपल्या मनाला ताजेतवाने करण्याची वेळ आली आहे. फक्त तिरंगा फडकवणे, कौटुंबिक जेवण किंवा सुट्टीचा आनंद घेणे पुरेसे नाही; हृदयाला भिडणारे, साहस, धैर्य आणि स्वातंत्र्याचे संदेश देणारे चित्रपट पाहून तुम्ही स्वतःला प्रेरणा आणि आनंद देऊ शकता. एअरटेल आयपीटीव्हीच्या माध्यमातून तुम्ही 29+ स्ट्रीमिंग अ‍ॅप्स, 600+ लाईव्ह टीव्ही चॅनेल्स आणि ऑन-डिमांड लायब्ररीसह हे चित्रपट घरच्या मोठ्या स्क्रीनवर पाहू शकतात. रिपब्लिक डे च्या दिवशी बघण्याजोग्या चित्रपटांमध्ये ‘फ्रीडम अ‍ॅट मिडनाईट सीझन 2, ‘द नाईट मॅनेजर सीझन 2’, ए नाईट ऑफ द सेवन किंगडम्स, ‘टास्करी: द स्मगलर्स वेब’, ‘हायजॅक’, ‘स्ट्रेंजर थिंग्ज 5’ यासारखी थरारक मालिका तसेच ‘120 बहादूर’, ‘‘बॉर्डर’, ‘शेरशाह’, ‘उरी: द सर्जिकल स्ट्राइक’, ‘राझी’ यासारखी देशभक्ती प्रेरित चित्रपटं उपलब्ध आहेत. एअरटेल आयपीटीव्हीचे प्लॅन्स फक्त 699 रुपयांपासून सुरू होतात आणि नवीन प्लॅन्सवर एअरटेल थँक्स अ‍ॅपद्वारे 30 दिवसांची मोफत सेवा देखील मिळते. या दिवशी देशभक्ती, शौर्य आणि प्रेरणादायी कथा पाहून सुट्टीचा आनंद दुपटीने वाढवा आणि देशभक्तीच्या भावनेत लांब वीकेंड साजरा करा!

### इयत्ता 10 वी व 12 वी परीक्षा कालावधीमध्ये समुपदेशकांची नियुक्ती

पुणे (दैनिक संध्या) : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे तर्फे घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी–मार्च २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आल्या आहेत. इयत्ता १२ वीची परीक्षा दि. १० फेब्रुवारी २०२६ ते दि. १८ मार्च २०२६ दरम्यान, तर इयत्ता १० वीची परीक्षा दि. २० फेब्रुवारी ते दि. १८ मार्च २०२६ या कालावधीत होणार आहे. परीक्षा कालावधीत विद्यार्थ्यांना अभ्यास व परीक्षेसंदर्भात काही अडचणी किंवा समस्या निर्माण झाल्यास त्यांना योग्य मार्गदर्शन मिळावे तसेच तणावमुक्त वातावरणात परीक्षा देता यावी, या उद्देशाने महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे पुणे विभागीय मंडळाच्या कार्यक्षेत्रातील पुणे, अहिल्यानगर व सोलापूर जिल्ह्यांमध्ये तज्ञ समुपदेशकांची नियुक्ती करण्यात आली आहे, अशी माहिती पुणे विभागीय मंडळाच्या सचिव डॉ. मिनाक्षी राऊत यांनी दिली आहे. विद्यार्थी व पालकांनी कोणत्याही अडचणीसाठी सकाळी ८ ते रात्री ८ या वेळेत खालील भ्रमणध्वनी क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### मोदींकडून होळकर व धनगर समाजाचा अपमान

मुंबई (दैनिक संध्या) : राजमाता अहिल्याबाई होळकर यांनी न्याय, धर्म आणि लोककल्याणासाठी राज्य केले, हिंदु धर्मासाठी पवित्र अशा काशी विश्वनाथ आणि सोमनाथ मंदिरांसह अनेक मंदिरांची पुनर्बांधणी केली. स्वतःला हिंदु धर्माचे रक्षक समजणाऱ्या नरेंद्र मोदी व योगी आदित्यनाथ यांनी मात्र आज अहिल्याबाईंनी काशीत बांधलेला पवित्र मणिकर्णिका घाट उद्ध्वस्थ केला, हा तमाम हिंदू तसेच धनगर समाजाचा अपमान आहे. मोदी-योगी यांनी हिंदुंच्या अस्मितेवर घाला घातला आहे. विकासाच्या नावाखाली हिंदुंच्या अस्मितेशी खेळण्याचा भाजपा, नरेंद्र मोदी व योगी आदित्यनाथ यांना काही अधिकार नाही, त्यांनी जाहीर माफी मागावी अशी मागणी काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे. प्रसार माध्यमांशी बोलताना नाना पटोले पुढे म्हणाले की, काशी हे केवळ एक शहर नसून हिंदु समाजासाठी अत्यंत मानाचे व पवित्र अध्यात्मिक केंद्र आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी याच काशीतून तीनवेळा निवडून आले आहेत. काशीच्या विकासाच्या नावाखाली नरेंद्र मोदी यांनी शेकडो मंदिरे तोडली आणि आता राजमाता अहिल्यादेवी होळकर यांनी बांधलेला मणिकर्णिका घाट उद्ध्वस्थ केला आहे, अहिल्यादेवींची प्रतिमाही तोडली. मणिकर्णिका घाटावर अंत्यसंस्कार केल्याने आत्म्याला थेट मोक्ष मिळतो, अशी हिंदु धर्मात धारणा आहे, हे ५१ शक्तीपीठांपैकी एक मानले जाते. हिंदु धर्मासाठी पवित्र अशा घाटावर बुलडोझर चालवून मोदी व योगी यांनी हिंदु समाजाचा घोर अपमान केला आहे.

# ‘स्क्रोलिंग’ थांबलं, इतिहास जागा झाला!

## गाणं, डॉक्युमेंटरी आणि डिजिटल युगातील संस्कार क्रांती

■ डॉ. श्याम टरके ■
सहायक संचालक (माहिती), विभागीय माहिती कार्यालय, लातूर

गुरू तेग बहादुर साहिब जी यांच्या शहीदीला ३५० वर्ष पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने भारतभर मोठ्या प्रमाणात कार्यक्रम होताहेत. परंतु नांदेड येथे होत असलेल्या या कार्यक्रमास विशेष असे महत्त्व आहे. या होत असलेल्या भव्य दिव्य अशा या श्री गुरु तेग बहादूर साहिब जी शहीदी आणि श्री गोविंद साहिबजी 350 व्या गुरतागद्दी शताब्दी कार्यक्रमास उपस्थित राहून, प्रत्येकाने इतिहासाचे साक्षीदार देखील व्हायलाच हवे.

मुंबई (दै. संध्या)

सध्याच्या 'फास्ट फूड', 'इन्स्टा रिल्स'च्या युगात एखादा ट्रेंड किती काळ टिकतो ? फार तर २४ तास! पण, याच डिजिटल जगात ४०० वर्षे जुन्या इतिहासाने आजच्या 'जनरेशन झी'ला (Gen Z) चक्क थांबायला भाग पाडले. निमित्त, सुप्रसिद्ध सुफी गायक डॉ. सतींदर सरताज यांच्या आवाजातील 'हिंद की चादर' या कलाकृतीचे.



नांदेडच्या पवित्र मातीत श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांचा ३५० व्या भव्य शहीदी समागम वर्षानिमित्त कार्यक्रम होत आहे. महाराष्ट्र शासन आणि श्री गुरू तेग बहादूरजी यांच्या ३५० व्या शहीदी शताब्दी समितीच्या सहकार्याने निर्वैर निर्मित 'हिंद की चादर' डॉक्युमेंटरी (माहितीपट), अन् सरताज यांचे गीत आता केवळ व्हायरल कंटेंट उरला नसून, ती एक 'संस्कारांची डिजिटल चळवळ' बनली आहे.

या चळवळीचा चेहरा आणि आवाज आहेत, डॉ. सतींदर सरताज. मूळचे पंजाबचे. सरताज केवळ गायक नाहीत, तर सुफी संगीतातील 'डॉक्टरेट' (Ph.D) आहेत. त्यांच्या गळ्यातून जेव्हा “सीस लेकर उसी ओर चल दिए...” हे शब्द उमटतात, तेव्हा त्यात केवळ संगीत नसते, तर १७ व्या शतकातील वेदना आणि त्यागाचा हुंकार असतो. त्यांच्या याच भारदस्त आवाजामुळे तरुणाई पॉप गाणी सोडून इतिहासाकडे वळली आहे.

आकडेवारीवर नजर टाकली तर थक्क व्हायला होते. २५ ऑक्टोबर २०२५ ला प्रदर्शित झालेल्या 'हिंद की चादर' या गाण्याने युट्युबवर अल्पावधीतच २.७६ कोटी (2.76 Crore+) व्ह्यूजचा टप्पा ओलांडला आहे. तर १.८३ लाखांहून अधिक लाईक्स असे सिद्ध करतात, की हे गीत लोकांनी फक्त ऐकले नाही, तर अनुभवले आहे.

केवळ युट्युबच नाही, तर इन्स्टाग्रामवरही (Instagram) या गाण्याची लाट आली आहे. विशेषतः "सीस लेकर उसी ओर चल दिए" या ओळींवर तरुणाईने बनवलेले हजारो 'रिल्स' (Reels) सध्या सोशल मीडियावर इमोशनल ट्रेंड बनले आहेत. दुसरीकडे, निर्वैर प्रॉडक्शन (Nirvair Productions) निर्मित १६ मिनिटांच्या डॉक्युमेंटरीला मिळालेले ४६ लाख (46 Lakhs+) व्ह्यूज हे सांगण्यासाठी पुरेसे आहेत की, चांगल्या कंटेंटला 'अल्गोरिदम'ची गरज नसते, त्याला 'भावनांचा' आधार असतो.

शाळांमध्ये इतिहास शिकवला जातो, पण तो पडद्यावर 'दाखवला' तर ? महाराष्ट्र शासनाने नेमका हाच धागा पकडला आहे. शाळा, महाविद्यालयांमध्ये एक आगळावेगळा राबवत श्री गुरु तेग बहादुर साहिब जी (गुरूजी) यांच्या जीवन,शिक्षण आणि सर्वोच्च बलिदानावर आधारित माहितीपट दाखवण्यात येत आहे. या माहितीपटात VFX आणि अ‍ॅनिमेशनचा वापर करून जुन्या काळातील 'सेपिया' आणि 'गोल्डन' टोन उभा केला आहे.

राज्यातील शाळांमधून गुरुजींचा इतिहास विद्यार्थी मोठ्या पडद्यावर पाहत आहेत. या इतिहासातून ते प्रेरणा घेत आहेत. इतिहास समजून घेत आहेत. जेव्हा विद्यार्थी पडद्यावर पाहतात, की गुरुजींच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यासाठी भाई लखी शाह बंजारा चक्क स्वतःचे घर जाळून टाकतात, तेव्हा वर्गातली शांतता खूप काही सांगून जाते. जे संस्कार शंभर व्याख्यानांतून करणे अवघड आहे, ते या माहितीपटातून होण्यास मदत होते.

हा माहितीपट, गीत इतिहास जिवंत करते. अशा महानायकांना सलाम करते. हा सर्व इतिहास पुस्तकातून आता थेट लोकांच्या काळजात कोरल्या जात आहे.

भाई मख्खन शाह लबाना : ज्यांनी समुद्राच्या तुफानातून वाचल्यावर 'खऱ्या गुरूंचा' शोध लावला.

भाई लखी शाह बंजारा: दिल्लीच्या चांदनी चौकात मुघलांच्या नाकावर टिच्चून ज्यांनी "घरदार जळाले तरी चालेल, पण गुरुजींची शान राहिली पाहिजे," हा बाणा जपला

भाई जैता जी : गुरुजींचे पवित्र शीर (मस्तक) सांभाळून, अतिशय कठीण प्रवासाने आनंदपूर साहिबला आणले व गुरू तेगबहादुर जी यांचे पुत्र गुरू गोविंदसिंह जी यांच्याकडे सुपूर्द केले.

नांदेड : विश्वासाचे केंद्र

या साऱ्याचा केंद्रबिंदू आहे नांदेड. गोदावरीच्या काठावर वसलेले शहर. हे केवळ शहर नसून एक मोठे पवित्र तीर्थस्थान आहे. हे पवित्र स्थळ शीख धर्मातील पाच तख्तांपैकी एक आहे. येथे हजूर साहिब गुरूद्वारा, ज्याला तख्त सचखंड श्री हजूर अबचलनगर साहिब म्हणून ओळखले जाते. दहावे गुरू गुरू गोविंद सिंह यांचे अंतिम विश्रांतीस्थान आहे. श्री गुरू गोविंद सिंहांचे वास्तव्य या भूमीस लाभले. त्याचबरोबर गुरू गोविंद सिंहांनी त्यांच्यानंतर पवित्र ग्रंथालाच शाश्वत गुरू म्हणून घोषित केले. शीख धर्माचे अकरावे आणि अंतिम गुरू पवित्र गुरू ग्रंथ साहिब याच ठिकाणी आहेत. त्यामुळे या पवित्र भूमीत होत असलेल्या श्री गुरू तेग बहादूर साहिब जी ३५० शहीदी आणि श्री गोविंद साहिब जी ३५० व्या गुरतागद्दी शताब्दी निमित्ताने आयोजित कार्यक्रमाकडे संपूर्ण जग पाहत आहे.

शाळेतील मुलांच्या प्रभात फेऱ्या असोत किंवा राज्यातील सिनेमागृहात चित्रपटाच्या सुरूवातीला दाखवले जाणारे गुरूजींच्या जीवनावर आधारित गीत, माहितीपट असो; प्रत्येक ठिकाणाहून गुरूजींचे जीवन, शिकवण आणि त्यांचे सर्वोच्च बलिदान हा संदेश दिला जात आहे. सरताज यांनी गायलेले गीत, गुरूजींवर आधारित माहितीपट ३५० वर्षांपूर्वीच्या प्रेरक इतिहासाचा आजच्या भाषेतला 'दस्तावेज' (Document) आहे. औरंगजेबाच्या तलवारीपेक्षा गुरुजींचा शांततेचा आणि त्यागाचा मार्ग किती शक्तिशाली होता, हे समजून घेण्यासाठी एकदा तरी ही कलाकृती सर्वांनी पाहायलाच हवी!



## लेक्स नोव्हा – आयपीआर संशोधन केंद्राचे उद्घाटन

मुंबई (दै. संध्या)

केईएस श्री जयंतीलाल एच. पटेल लॉ कॉलेजने बौद्धिक संपदा हक्क (IPR) क्षेत्रातील कायदेशीर जागरूकता वाढवणे आणि शैक्षणिक संशोधनाला चालना देणे या उद्देशाने लेक्स नोव्हा – बौद्धिक संपदा संशोधन केंद्राचे यशस्वीपणे उद्घाटन केले.उपस्थितांना संबोधित करताना, प्रभारी प्राचार्या डॉ. व्हायरल दवे यांनी सांगितले की, लेक्स नोव्हाची स्थापना हे कायद्याच्या उदयोन्मुख आणि विशेष क्षेत्रांमध्ये संशोधनाला प्रोत्साहन देण्याप्रती संस्थेच्या दृढ वचनबद्धतेचे प्रतीक आहे. त्यांनी यावर जोर दिला की, हे केंद्र कायदेशीर शिक्षण, नावीन्य आणि उद्योगाच्या गरजा यांच्यातील दरी कमी करण्याचे उद्दिष्ट ठेवते. उद्घाटन समारंभाला बौद्धिक संपदा क्षेत्रातील प्रतिष्ठित तज्ञांनी उपस्थिती लावून शोभा वाढवली.

भारत सरकारच्या मुंबई येथील पेटंट कार्यालयाचे पेटंट आणि डिझाइन्सचे सहाय्यक नियंत्रक श्री. सागर पोल यांनी नावीन्यपूर्णतेला चालना देण्यासाठी, संशोधनाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि राष्ट्रीय विकासात योगदान देण्यासाठी बौद्धिक संपदा हक्कांच्या महत्त्वपूर्ण भूमिकेवर प्रकाश टाकला. लेक्स मॅन्टिसच्या संस्थापिका श्रीमती अनुराधा माहेश्वरी यांनी स्पर्धात्मक जागतिक वातावरणात उद्योग, स्टार्टअप्स आणि कायदेशीर व्यावसायिकांसाठी बौद्धिक संपदेच्या धोरणात्मक महत्त्वावर भर दिला.

## जेएसएस विभागीय परिषद आणि भागधारकांचा सल्लामसलत मेळावा संपन्न

पुणे (दै. संध्या)

■ उपजीविका-केंद्रित कौशल्य विकास आणि क्षमता बांधणीवर भर

कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाच्या (एमएसडीई) वतीने आज पुण्यातील 'सिम्बायोसिस स्किल अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटी' येथे आयोजित दोन दिवसीय 'जन शिक्षण संस्थान' (जेएसएस) विभागीय परिषद, भागधारकांचा सल्लामसलत मेळावा आणि प्रगती आढावा कार्यशाळा संपन्न झाली. या परिषदेद्वारे भारत सरकारने शेवटच्या घटकापर्यंत सर्वसमावेशक, समुदाय-आधारित कौशल्य विकास आणि शाश्वत उपजीविका निर्मिती करण्याच्या आपल्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला आहे. कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाद्वारे आयोजित या परिषदेत ११ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील १५२ जन शिक्षण संस्थांच्या प्रतिनिधींनी सहभाग घेतला होता. या कार्यक्रमात जेएसएसचे अभ्यासक, मंत्रालयाचे वरिष्ठ अधिकारी, जन शिक्षण संस्थान संचालनालयाचे अधिकारी, 'निसबूड'चे प्रतिनिधी आणि



शैक्षणिक भागीदार एकत्र आले होते. याद्वारे जेएसएस परिसंस्थेतील प्रगतीचा आढावा घेणे, प्रणालीगत सुधारणांवर चर्चा करणे आणि संस्थात्मक क्षमता वाढवणे यावर भर देण्यात आला. या परिषदेचे अध्यक्षपद कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाच्या सचिव देबश्री मुखर्जी यांनी भूषवले. यावेळी मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव निरंजन कुमार सुधांशू आणि इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. रोजगाराभिमुखता, उद्योजकता आणि उपजीविकेचे परिणाम अधिक बळकट करण्यावर या परिषदेत विशेष भर देण्यात आला.

परिषदेला संबोधित करताना देबश्री मुखर्जी म्हणाल्या की, भारतातील सर्वसमावेशक कौशल्य विकासामध्ये 'जन शिक्षण संस्थां'ची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. आमचा मुख्य उद्देश प्रशिक्षणाकडून प्रत्यक्ष परिणामांकडे वळण्याचा आहे. यासाठी माजी विद्यार्थ्यांशी संपर्क वाढवणे, बाजारातील मागणीनुसार कौशल्ये विकसित करणे आणि वित्त व बाजारपेठेशी जोडून उद्योजकतेला पाठबळ देणे आवश्यक आहे. पारंपारिक कौशल्यांचे आधुनिकीकरण करून आणि यशस्वी प्रकल्पांचा विस्तार करून, तळागाळातील कौशल्य विकास हा महिला आणि वंचित घटकांसाठी शाश्वत उपजीविका, सन्मान आणि सक्षमीकरणाचा मार्ग ठरेल याची खात्री करणे हे आमचे ध्येय आहे.

या परिषदेत 'निसबूड' आणि सिम्बायोसिस स्किल अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटीच्या तज्ज्ञांमार्फत रोजगार कौशल्य आणि उद्योजकता विकासावर विशेष सत्रे घेण्यात आली. निसबूडच्या महासंचालक डॉ. पूनम सिन्हा आणि सिम्बायोसिसच्या प्रो-चॅन्सलर डॉ. स्वाती मजूमदार यांनी या सत्रांचे नेतृत्व केले. त्यांनी प्रशिक्षणार्थी-केंद्रित कौशल्य विकास, कामासाठीची सज्जता आणि तळागाळात उद्योजकीय विचारांची गरज यावर प्रकाश टाकला.

उपजीविकेच्या शाश्वततेसाठी वित्तीय समावेशाची भूमिका ओळखून, सेंट्रल बँक ऑफ इंडिया आणि निसबूडच्या तज्ज्ञांसोबत 'वित्तीय आणि पतपुरवठा दुवे' यावर आधारित एक सत्र आयोजित करण्यात आले होते. जेएसएस लाभार्थ्यांना त्यांच्या कौशल्याचे रूपांतर उत्पन्नाच्या संधींमध्ये करता यावे, यासाठी बँकांशी मजबूत जोडणी, आर्थिक साक्षरता आणि संरचित आधार प्रणालीची आवश्यकता यावर या सत्रात चर्चा झाली.

# नवीन ग्रीनफिल्ड उत्पादन प्लांटने मोल्डिंग सोल्यूशन्सच्या जागतिक धोरणाला केले दृढ

पुणे (दै. संध्या)

मोल्डिंग सोल्यूशन्सने आपले ब्रँड्स मॅनेर, फोबोहा, सिन्वेन्टिव्ह, थर्मोप्ले, गॅमाफ्लक्स आणि प्रियामस यांच्यासह सहयोगाने भारतात आपल्या नवीन ग्रीनफिल्ड प्लांटचे अधिकृतरित्या उद्घाटन केले आहे, ज्यासह आपल्या आंतरराष्ट्रीय उत्पादन व सेवा उपस्थितीमध्ये अधिक वाढ केली आहे. हा प्लांट कंपनीच्या दीर्घकालीन धोरणाचा प्रमुख भाग आहे आणि हॉट रनर सिस्टम्समधील कंपनीच्या जागतिक स्पर्धात्मकतेला मोठ्या प्रमाणात प्रबळ करतो.




भविष्याकडे वाटचाल करत कंपनीची भारतातील उत्पादन, स्थानिक अभियांत्रिकी क्षमता आणि संशोधन व विकास उपक्रमांमध्ये वाढ करण्याची योजना आहे. कंपनीच्या नेतृत्वाने निदर्शनास आणले की भारत टूलिंग व इंजेक्शन मोल्डिंग तंत्रज्ञानांसाठी प्रमुख जागतिक डिझाइन व उत्पादन केंद्र बनण्याची अपेक्षा आहे, ज्यासह आयात-केंद्रित मॉडेलवरून झपाट्याने देशांतर्गत उत्पादन व निर्यातींवर केंद्रित मॉडेलमध्ये बदल करत आहे.

20 जानेवारी 2026 रोजी इंडिया ग्रँड ओपनिंगचे आयोजन करण्यात आले, ज्यामध्ये पारंपारिक भारतीय उद्घाटन समारोह पार पडला. 21 जानेवारी 2026 रोजी ग्राहकांना व सहयोगींना कस्टमर इव्हेण्टमध्ये आमंत्रित करण्यात आले, जेथे नवीन प्लांट आणि त्यामधील टेक्निकल क्षमतांबाबत माहिती देण्यात आली.

**प्रमुख विकास बाजारपेठ म्हणून भारताचे महत्त्व :** भारत इंजेक्शन मोल्डिंग उपयोजनांसाठी जगातील सर्वात मोठी आणि झपाट्याने विकसित होत असलेली बाजारपेठ आहे. नवीन प्लांटसह मोल्डिंग सोल्यूशन्स या प्रदेशातील ग्राहकांच्या जवळ पोहोचली आहे, तसेच शाश्वत विकासासाठी प्रबळ पाया निर्माण करत आहे. या गुंतवणूकीचा वितरणासाठी लागणारा कालावधी कमी करण्याचा, उत्पादन क्षमता वाढवण्याचा आणि सेवा पातळ्यांमध्ये अधिक सुधारणा करण्याचा मनसुबा आहे.

हॉटर रनर सिस्टम्स आणि संबंधित मोल्डिंग तंत्रज्ञानांसाठी जागतिक बाजारपेठ कोट्यवधी डॉलर्स असण्याचा अंदाज आहे, जेथे मोल्डिंग सोल्यूशन्सचा सध्या जागतिक स्तरावर 10 टक्क्यांपेक्षा कमी मार्केट शेअर आहे. भारतात, कंपनीचा ही बाजारपेठ जवळपास 200 दशलक्ष अमेरिकन डॉलर्स असण्याचा अंदाज आहे, जेथे मार्केट शेअर 15 टक्के ते 20 टक्क्यांपर्यंत आहे, ज्यामधून प्रांतामधील कंपनीची प्रबळ विकास गती दिसून येते.

मोल्डिंग सोल्यूशन्सने ऑटोमोटिव्ह क्षेत्रात आपले प्रबळ स्थान निर्माण केले आहे. विशेषत: सिन्वेन्टिव्ह ब्रँडच्या माध्यमातून कंपनीला अचूकपणे मोल्ड केलेले कम्पोनण्ट्स आणि प्रगत उत्पादन मानकांसाठी वाढती मागणी पाहता वैद्यकीय, आरोग्यसेवा, एफएमसीजी, इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रांमध्ये झपाट्याने वाढ करण्याची संधी दिसत आहे.

**जागतिक उत्पादन धोरणाचा भाग म्हणून लोकल-फॉर-लोकल :** आतापर्यंत चीनमधील मोल्डिंग सोल्यूशन्सच्या उत्पादन प्लांट्सनी भारतातील बहुतांश बाजारपेठांच्या गरजांची पूर्तता केली आहे. नवीन प्लांट या अवलंबनाला मोठ्या प्रमाणात कमी करते, तसेच सातत्यपूर्ण लोकल-फॉर-लोकल दृष्टिकोन सक्षम करते. भारतातील प्लांट देशांतर्गत बाजारपेठेला पुरवठा करण्यासोबत व्यापक आशियाई प्रांतासह आग्नेय आशिया, जपान व दक्षिण कोरियामधील बाजारपेठांना देखील पुरवठा करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावेल. याव्यतिरिक्त चीनमधील प्लांट आपल्या देशांतर्गत बाजारपेठेला स्वतंत्रपणे पुरवठा करत राहिल.

मोल्डिंग सोल्यूशन्सच्या नेतृत्वामधून निदर्शनास आले की भारत आता आशियासाठी (चीन वगळून) कंपनीचे प्रमुख उत्पादन व सेवा केंद्र बनण्यास सज्ज आहे, ज्यासह पुरवठा यंत्रणेची स्थिरता प्रबळ होईल आणि सीमेपलीकडून आयातींवरील अवलंबन कमी होईल.

भारतामधून मोल्डिंग सोल्यूशन्स देशांतर्गत बाजारपेठेला व आशियामधील इतर देशांना पुरवठा करते, तसेच विद्यमान ठिकाणांमध्ये बदल न करता जागतिक उत्पादन क्षमतेमध्ये वाढ करण्यात आली आहे.

भारत जगभरातील आमच्या विकासासामधील सर्वात महत्त्वपूर्ण बाजारपेठ आहे. या नवीन प्लांटसह आम्ही वितरणाकरिता लागणारा कालावधी कमी करण्याठी, उत्तम स्थिरतेसाठी आणि प्रांतामधील ग्राहकांसोबत टेक्निकल सहयोग करण्यासाठी स्थिती निर्माण करत आहोत, तसेच आमच्या जागतिक मानकांचे पालन करत आहोत, असे मोल्डिंग सोल्यूशन्सचे अध्यक्ष मार्सेलो वेंडेमियाटी म्हणाले.

**प्लांटवरील सर्वसमावेशक हॉट रनर क्षमता :** नवीन प्लांट हॉट रनर सिस्टम्सचा विकास, उत्पादन व पाठिंब्यासाठी क्षमतांची संपूर्ण श्रेणी देतो. कार्यसंचालनांच्या सुरूवातीपासून सिन्वेन्टिव्ह आणि थर्मोप्ले ब्रँड्सच्या सिस्टम्सचे साइटवर उत्पादन करण्यासोबत साह्य करण्यात आले आहे.

सध्या, पुण्यातील प्लांटची कंपनीच्या उत्पादन पोर्टफोलिओमधील जवळपास 50 टक्के उत्पादन करण्याची क्षमता आहे, तसेच बाजारपेठेतील मागणी वाढण्यासह स्थानिक कार्यसंचालनांमध्ये अधिक वाढ होत असल्यामुळे संपूर्ण उत्पादन श्रेणी वाढवण्याची योजना आहे.

**प्रमुख टेक्निकल क्षमता पुढीलप्रमाणे:**

- **डिझाइन इंजीनिअरिंग**
- **मोल्ड फ्लो विश्लेषण**
- **उपयोजनाबाबत तपासणी**
- **हॉट रनर सिस्टम्सची असेम्ब्ली**
- **विक्री-पश्चात्त सेवेसह रिपेअर सेंटर**
- **दर्जा व्यवस्थापन आणि प्रमुख अकाऊंट मॅनेजमेंट**

या सेटअपमध्ये हॉट रनर मूल्य सखळीच्या सर्व प्रमुख टप्प्यांचा समावेश आहे आणि जागतिक स्तरावर सतत दर्जा व प्रक्रिया मानक राखले जाण्याची खात्री घेतली जाते.

**जागतिक स्तरावर कनेक्टेड, स्थानिक स्तरावर केंद्रित :** लॉंचप्रसंगी प्लांटमध्ये अभियांत्रिकी, कार्यसंचालन, विक्री, विक्री-पश्चात्त सेवा आणि प्रशासन या क्षेत्रात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची टीम आहे. टीम्स युरोप, चीन व युनायटेड स्टेट्समधील मोल्डिंग सोल्यूशन्सच्या जागतिक नेटवर्कशी संपर्कात आहेत आणि त्यानुसार काम करत आहेत.

पुढील काही वर्षांमध्ये कंपनीला आपल्या उत्पादन विभागामधील कर्मचारी संख्या जवळपास 120 पर्यंत वाढण्याची अपेक्षा आहे. अभियांत्रिकी, विक्री व प्रशासकीय टीम्ससह एकूण कर्मचारी संख्या 250 पर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे, जे बाजारपेठेतील वाढीवर अवलंबून असेल. 2026 च्या अखेरीस कर्मचाऱ्यांची संख्या जवळपास 220 पर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे.

मोल्डिंग सोल्यूशन्सला ग्राहकांकडून आधीच उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे, उद्घाटनानंतर ग्राहक संवाद उपक्रमाचा भाग म्हणून 120 हून अधिक कंपन्या या नवीन प्लांटला भेट देतील अशी अपेक्षा आहे.

तसेच भारतातील स्थानिक टीमला प्रादेशिक बाजारपेठेतील गरजांबाबत सखोलपणे माहित आहे, ज्यासह त्वरित प्रतिसाद आणि ग्राहक-केंद्रित टेक्निकल सपोर्ट देता येत आहे.

मोल्डिंग सोल्यूशन्सने 16,000 चौरस मीटर उत्पादन व कार्यालय सुविधेमध्ये गुंतवणूक केली, ज्यामध्ये आधुनिक मशिनरी ताफा देखील आहे.

गुंतवणूक, संशोधन व विकास आणि दीर्घकालीन विस्तारीकरण दृष्टिकोन

मोल्डिंग सोल्यूशन्सने आतापर्यंत पुण्यातील प्लांटमध्ये जवळपास 30 दशलक्ष डॉलर्स गुंतवणूक केली आहे, जेथे प्रामुख्याने अत्यंत अचूक मशिनरी, उत्पादन यंत्रणा आणि निश्चित उत्पादन पायाभूत सुविधेमध्ये गुंतवणूक करण्यात आली आहे. कंपनीला या प्लांटचा विस्तार होत असताना साइटमधील एकूण गुंतवणूक 50 दशलक्ष अमेरिकन डॉलर्सपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे. जागतिक स्तरावर ग्रुप जवळपास 5 टक्के वार्षिक महसूल संशोधन व विकासामध्ये गुंतवतो, ज्याचे मूल्य प्रति वर्ष जवळपास 20 दशलक्ष अमेरिकन डॉलर्स आहे. याअंतर्गत नवीन तंत्रज्ञान, उत्पादन नाविन्यता आणि प्रगत उत्पादन सोल्यूशन्सवर लक्ष केंद्रित केले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## ‘बजाज पुणे ग्रँड टूर’अंतर्गत तिसऱ्या टप्प्याचे 22 जानेवारी रोजी आयोजन

पुणे (दैनिक संध्या) : ‘बजाज पुणे ग्रँड टूर–२०२६’अंतर्गत गुरुवार, दि. २२ जानेवारी २०२६ रोजी टप्पा क्रमांक तीनचे सासवड ते बारामती दरम्यान आयोजन करण्यात आले आहे, या स्पर्धेची सुरुवात दुपारी १२ वाजून ३० वाजता सासवड येथील नगरपरिषद, चंदन टेकडी येथून होणार असून बारामती येथील विद्या प्रतिष्ठान कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय येथे शेवट होणार आहे. त्यामुळे नागरिकांनी देश-विदेशातील सायकलपटूचे कौशल्य बघण्याची संधी मिळणार आहे.  या टप्प्यात सासवड व बारामती तालुक्यातून रेस जाणार आहे. या स्पर्धेची एकूण १३७.७ किलोमीटर आहे. प्रशासनाने मार्गावर संपूर्ण स्वच्छता राहील, यादृष्टीने स्थानिकांना विश्वासात घेवून सूक्ष्म नियोजन करण्यात आले, स्थानिक लोकप्रतिनिधी, नागरिक, गृहनिर्माण सोसायटी व गणेश मंडळाचे पदाधिकारी, महाविद्यालये, राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी, क्रीडा संघटनेचे पदाधिकारी आदी घटकांनी मिळून प्रशासनासोबत स्पर्धा यशस्वी करण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे. असा असेल स्पर्धेचा टप्पा-३ : येथून स्पर्धेचा प्रारंभ होऊन सासवड, सुपे, पानवडी घाट, काळदरी (बोरी फाटा), मांढर, माहूर, परींचे, हरणी, वाल्हे, पिसुर्टी, नीरा, ब्राह्मणधरा, मुर्टी, मोरगाव, तरडोली, जळगाव क.प., कन्हावागज, खंडोबानगर, पिंपळी, लिमटेक, कन्हेरी, रुई रोड सावळ, वंजारवाडी आणि विद्या प्रतिष्ठान कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, बारामती येथे स्पर्धेचा शेवट होणार आहे.



## पुणे जिल्ह्यात गणित प्रावीण्य व पारंगत परीक्षा उत्साहात संपन्न

जेजुरी (दैनिक संध्या) : महाराष्ट्र गणित अध्यापक महामंडळ आणि पुणे जिल्हा गणित अध्यापक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेली इयत्ता ५ वी व ८ वी गणित प्रावीण्य परीक्षा तसेच इयत्ता १० वी गणित पारंगत परीक्षा पुणे जिल्ह्यात नुकत्याच मोठ्या उत्साहात आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडल्या. या परीक्षेस पुणे जिल्ह्यातील विविध शाळांमधील सुमारे २७०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. जिल्ह्यातील एकूण ३१ परीक्षा केंद्रांवर ही परीक्षा यशस्वीरित्या घेण्यात आली, अशी माहिती पुणे जिल्हा गणित अध्यापक संघाचे सचिव  सचिन धनवट यांनी दिली. महाराष्ट्र गणित अध्यापक महामंडळाच्या वतीने गेल्या ५० वर्षांहून अधिक काळापासून सातत्याने या परीक्षा घेण्यात येत आहेत. या परीक्षांमुळे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाला चालना मिळत असून गणित विषयातील विविध संकल्पना व आव्हाने विद्यार्थ्यांना लवकर समजण्यास मदत होते. त्यामुळे या परीक्षांबाबत विद्यार्थी तसेच पालकवर्गात मोठ्या प्रमाणावर आकर्षण निर्माण झाले आहे, असे मत महामंडळाच्या विद्या समितीचे प्रमुख देविदास शिंदे यांनी व्यक्त केले. या परीक्षेचे यशस्वी आयोजन करण्यासाठी पुणे जिल्हा गणित अध्यापक संघाचे अध्यक्ष  कल्याण कडेकर, कार्याध्यक्ष संदीप लोणकर, परीक्षा समिती प्रमुख  विजय फापाळे,  लक्ष्मीकांत मुंडे, कोषाध्यक्ष  योगेश माळशिरसकर, उपाध्यक्ष  राजेंद्र पाटेकर, पुणे शहर अध्यक्ष  भगवान पांडेकर तसेच सर्व तालुका गणित अध्यापक संघांचे कार्यकारिणी सदस्य व गणित अध्यापक यांनी विशेष परिश्रम घेतले.

# पुरंदरवासीयांच्या आदरातिथ्याने जिंकली सायकलपटूंची मने

**सासवड(दै. संध्या)**

‘बजाज पुणे ग्रँड टूर-२०२६’ अंतर्गत स्पर्धेचा दुसरा टप्पा बुधवारी (ता. २१) अत्यंत उत्साहात पार पडला. देशातील सर्वांत मोठी सायकल स्पर्धा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या स्पर्धेमध्ये पुरंदर तालुक्याने आपल्या आदरातिथ्याने परदेशी सायकलपटूंची मने जिंकली. या आव्हानात्मक मार्गावर पुरंदरचा निसर्ग आणि गडकिल्ल्यांचा इतिहास पुन्हा एकदा जगासमोर आला.

पुण्यातील कॅम्प येथील लेडीज क्लब येथून या स्पर्धेला सुरुवात झाली. खरी चुरस पाहायला मिळाली ती बोपदेव घाटात. दुपारी १ वाजता सायकलपटूंचा ताफा अवघड चढण असलेला बोपदेव घाट चढून पुरंदर तालुक्यात दाखल झाला. घाटात अखेरच्या टप्प्यात काही लहान मुलं आणि नागरिकांनी स्पर्धकांचे स्वागत करून प्रोत्साहन दिले. बोपदेव माची येथे प्रवेश करताच बोपदेव देवस्थान ट्रस्टच्या वतीने स्वागतकमानी तसेच पुढे आस्करवाडी व पठारवाडी फाट्यावर ग्रामस्थांनी स्पर्धकांचे स्वागत केले. भिवरी येथे ग्रामपंचायत तसेच शालेय विद्यार्थांनी तसेच येथील वसंतदादा पाटील प्रतिष्ठानच्या कला व वाणिज्य महाविद्यालयाचे विद्यार्थी, शिक्षक तसेच राष्ट्र सेवा दलाच्या स्वयंसेवकांनी सायकल रांगोळी काढत आणि तिरंगा उंचावत स्पर्धकांचे स्वागत केले. पुढे बोपगाव येथे ग्रामस्थांनी स्वागतकमानी उभारून परदेशी पाहुण्यांचे स्वागत केले. चांबळी येथे चांबळी व हिवरेतील विद्यार्थांनी तसेच ग्रामपंचायतीच्या वतीने स्वागत करण्यात आले. स्पर्धा जसजशी पुढे सरकली, तसतसा उत्साह वाढत गेला. कोडीत आणि नारायणपूर या गावांमध्ये स्थानिक नागरिकांनी खेळाडूंना प्रोत्साहन दिले. पुरंदर किल्ल्याच्या पश्चिम पायथ्याशी असलेल्या चिव्हेवाडी घाटात महादेव कोळी बांधवांनीही सायकलपटूंचे स्वागत केले. प्रत्येक गावातील मुख्य चौकात आणि वळणाच्या ठिकाणी नागरिकांनी उपस्थित राहून स्वागत करीत स्पर्धकांचा उत्साह वाढविला. स्थानिक लोकप्रतिनिधी, शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी खेळाडूंचे स्वागत केले. पुरंदरच्या ऐतिहासिक भूमीतून ही स्पर्धा पुढे भोर तालुक्यात मार्गस्थ झाली. दरम्यान, पुरंदरमधील मार्गावर कोणतीही दुर्घटना झाली नाही तसेच कोणत्याही प्रकारचा अडथळा आला नाही असे सासवडचे पोलिस निरीक्षक कुमार कदम यांनी सांगितले. मार्गावर चोख पोलिस बंदोबस्त तैनात होता.




## परीक्षा केंद्र सुविधा व सीसीटीव्ही संदर्भात निधी बाबत दिलासा

**पुणे (दै. संध्या)**

■ शिक्षकांकडून मुंबई भाजपा अध्यक्ष आ. अमीत साटम यांचे आभार





इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षांच्या पार्श्वभूमीवर परीक्षा केंद्रांवर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे तसेच प्रत्येक वर्गात सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे अनिवार्य करण्यात आल्यामुळे अनेक शैक्षणिक संस्था व संघटनांकडून विरोध व्यक्त करण्यात आला होता.

मुंबई शहर शिक्षक विकास मंडळाचे प्रा. डॉ. विशाल कडणे यांनी प्रशासनाकडे परीक्षा केंद्रावरील सुविधा व सीसीटीव्ही बसविण्यासाठी स्वतंत्र विशेष निधीची व्यवस्था शासनाने तातडीने करावी आणि निधी उपलब्ध होईपर्यंत सक्ती करण्यात येऊ नये अशी आग्रही मागणी केली होती.

या मागणीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे सचिव डॉ. दीपक माळी यांनी स्पष्ट केले की दिनांक 13 मे 2022 च्या शासन निर्णयानुसार जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना (DPDC) अंतर्गत शालेय शिक्षण विभागाशी संबंधित योजनांसाठी राखीव ठेवलेल्या 5% निधीचा वापर सीसीटीव्ही बसविण्यासाठी करता येईल अशी तरतूद आहे.या स्पष्टोक्तीनंतर अनेक संस्थाचालकांनी समाधान व्यक्त केले आहे.

शैक्षणिक संस्थांना दिलासा मिळावा यासाठी विशेष प्रयत्न करणारे मुंबई भाजप अध्यक्ष आ. अमितजी साटम यांचे सर्व शिक्षक संघटना आणि संस्थाचालकांच्या वतीने प्रा. डॉ. विशाल कडणे यांनी मनःपूर्वक आभार मानले आहेत.

विषयावर सातत्याने मार्गदर्शन करणारे आचार्य पावन त्रिपाठी आणि किरण शेलार यांचे शिक्षक समुदायाने विशेष धन्यवाद मानले आहेत.

संस्था आणि शिक्षक संघटनांच्या वतीने प्रा. डॉ. विशाल कडणे यांनी पुढील मुद्दे शासनाकडे मांडण्याबाबत प्रयत्नशील असल्याचे सांगितले.

13 मे 2022 पासून DPDC शालेय शिक्षण विभागाशी संबंधित योजनापैकी  5% निधीपैकी आतापर्यंत किती निधी वापरला गेला

सदर 5% निधी महाराष्ट्रातील सर्व शाळांमध्ये सीसीटीव्ही बसविण्यासाठी पुरेसा आहे का

जर निधी अपुरा ठरत असेल, तर येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात अतिरिक्त निधीची तरतूद शासनाने करावी.

> मुंबई शहर शिक्षक विकास मंडळाच्या वतीने आम्ही शासनाच्या स्पष्टोक्तीचे स्वागत करतो आणि सर्व संबंधित मान्यवरांचे मनःपूर्वक आभार मानतो. शिक्षक-विद्यार्थी हित जपणाऱ्या, पारदर्शक आणि सहकार्यपूर्ण निर्णयप्रक्रियेच्या माध्यमातून परीक्षा केंद्रांची गुणवत्ता व सुरक्षितता निश्चितच उंचावेल.
> **— प्रा. डॉ. विशाल कडणे मुंबई शहर शिक्षक विकास मंडळ**



## बारामतीत नव्या चेहऱ्यांना संधी.! झेडपीसाठी दावेदारांना धक्का

**माळेगाव (दै. संध्या)**

■ राष्ट्रवादीचे गुप्त डावपेच

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीचे वातावरण सध्या तापलेले असून उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस होता. बारामती येथे सकाळपासूनच अनेकांनी अर्ज दाखल केले. दुपारी ३ वाजेपर्यंत अपक्ष उमेदवारांचीही मोठी गर्दी दिसली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसने गुप्तता पाळत एकाचवेळी सर्व उमेदवारांचे अर्ज दाखल केले. उमेदवारी कोणाला मिळाली याबाबत पक्षाने पूर्ण गोपनीयता राखली. यंदा राष्ट्रवादीने अनेक नव्या चेहऱ्यांना संधी दिली असून त्यामुळे जुन्या व प्रबळ दावेदारांना मोठा धक्का बसला आहे. काही ठिकाणी उमेदवारीबाबत अनिश्चितता असल्याने अनेकांनी अपक्ष म्हणून अर्ज दाखल केला आहे. विशेष म्हणजे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी शरद पवार गटाशी युती केली असून, इतर मित्रपक्षांनाही उमेदवारीत स्थान दिले आहे. त्यामुळे अजित पवार यांनी बेरजेचे राजकारण करत उमेदवार रिंगणात उतरवले आहेत. रणनीतीमुळे राजकीय वर्तुळात आश्चर्य व्यक्त होत आहे.

## जय–पराजय विसरून एकत्र; वाघोलीत जपली राजकीय संस्कृती

**वाघोली (दै. संध्या)**

वाघोली (तालुका हवेली) येथील पंचायत समिती हवेलीच्या माजी सभापती वसुंधरा शिवदास उबाळे व रत्नमाला संदीप सातव यांच्यात नगरसेवक पदासाठी निवडणूक झाली होती. रत्नमाला सातव या निवडणुकीत विजयी झाल्या असल्या तरीही वसुंधरा शिवदास उबाळे व रत्नमाला संदीप सातव यांचे कौटुंबिक संबंध असल्याने निवडणुकीतील जय पराजय विसरून एकमेकांना शुभेच्छा दोन्ही कुटुंबीयांनी दिल्या असून याच माणुसकीच्या दर्शनाने राजकीय संस्कृती आज देखील टिकून असल्याचे वाघोली येथे चित्र निर्माण झाले आहे. वाघोली ग्रामपंचायत कार्यकाळात लोकनियुक्त महिला सरपंच वसुंधरा शिवदास उबाळे व उपसरपंच पदाचा कार्यकाल पूर्ण करणारे संदीप सातव यांनी वाघोलीच्या विकासासाठी सर्व ग्रामपंचायत सदस्यांच्या साथीने विकासाभिमुख कामे केली होती. ग्रामपंचायत निवडणुकीतील गट तट बाजूला ठेवून वाघोली मध्ये विकास कामे मोठ्या प्रमाणात झाली होती. पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजप कडून रत्नमाला संदीप सातव तर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कडून वसुंधरा उबाळे यांनी एकमेकांविरोधात निवडणूक लढवली होती. मात्र निवडणुकीतील जय पराजय बाजूला ठेवत विकास कामांसाठी व वाघोली चे वैभव पुन्हा उभारण्यासाठी माजी सभापती वसुंधरा उबाळे यांनी रत्नमाला संदीप सातव यांना शुभेच्छा देत वाघोलीत राजकीय संस्कृतीचे अनोखे दर्शन घडवले आहे. निवडणुकीत विजय संपादन केल्याबद्दल वसुंधरा उबाळे व माजी सरपंच शिवदास उबाळे यांच्या हस्ते सातव परिवाराचा सन्मान करण्यात आला. उबाळे परिवाराचे रत्नमाला संदीप सातव यांनी त्यांचे आशीर्वाद घेऊन वाघोलीचा विकास थोरामोठ्यांच्या मार्गदर्शनाखाली करणार असल्याचे सांगितले आहे.

## आयसीएसआयचे २०२६ साठी नेतृत्व जाहीर

**सीएस पवनजी चांडक अध्यक्ष, सीएस द्वारकानाथ चेनूर उपाध्यक्ष**

**पुणे (दै. संध्या)**

इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया (आयसीएसआय) ने १९ जानेवारी २०२६ पासून लागू होणाऱ्या २०२६ या वर्षासाठी सीएस पवन जी चांडक यांची अध्यक्षपदी, तर सीएस द्वारकानाथ चेनूर यांची उपाध्यक्षपदी निवड जाहीर केली आहे.

कॉर्पोरेट आणि संबंधित कायद्यांमध्ये दोन दशकांहून अधिक अनुभव असलेले सीएस पवन जी चांडक यांनी यापूर्वी २०२५ मध्ये आयसीएसआयचे उपाध्यक्ष म्हणून काम पाहिले आहे. तसेच त्यांनी प्रादेशिक व शाखा स्तरावर विविध नेतृत्वाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली आहे.

आयसीएसआयचे फेलो सदस्य आणि दिवाळखोरी व्यावसायिक असलेले सीएस द्वारकानाथ चेनूर यांना कॉर्पोरेट कायदे व दिवाळखोरी क्षेत्रातील व्यापक अनुभव आहे. त्यांनी राष्ट्रीय व प्रादेशिक स्तरावर संस्थेतील अनेक महत्त्वाच्या नेतृत्व आणि समिती पदांवर कार्य केले आहे.

नवीन नेतृत्वाखाली आयसीएसआय सुशासन, सदस्य व भागधारकांच्या व्यावसायिक क्षमता-विकासावर तसेच जागतिक विस्तारावर विशेष भर देणार आहे. परदेशी केंद्रे आणि आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या माध्यमातून आयसीएसआय आपला जागतिक ठसा अधिक मजबूत करत असून, नावीन्य, शाश्वतता, समावेशक विकास आणि प्रशासकीय उत्कृष्टतेवर केंद्रित राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कार्यक्रमांचे आयोजन केले जात आहे.

आंतरराष्ट्रीय प्रशासन व्यावसायिकांसाठी जागतिक क्षमता-विकास कार्यक्रम राबविण्यासाठी आयसीएसआयने भारतीय तांत्रिक व आर्थिक सहकार्य (ITE C) चौकटीअंतर्गत परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाशी सहकार्य केले आहे. या उपक्रमांतर्गत कॉर्पोरेट प्रशासन, ईएसजी, शाश्वतता, जोखीम व्यवस्थापन तसेच भारतातील डिजिटल प्रशासन सुधारणा यांवर विशेष लक्ष केंद्रित केले जाणार आहे.

दरम्यान, जून २०२६ सत्रापासून लागू होणाऱ्या कंपनी सेक्रेटरी एक्झिक्युटिव्ह एंट्रन्स टेस्ट (CSEET) मध्येही महत्त्वपूर्ण सुधारणा करण्यात आल्या आहेत. ही परीक्षा आता वर्षातून तीन वेळा — फेब्रुवारी, जून आणि ऑक्टोबर — ऑफलाइन पद्धतीने घेतली जाणार आहे. या सुधारणांमुळे संकल्पनात्मक स्पष्टता, विश्लेषणात्मक क्षमता, संवाद कौशल्ये आणि व्यावहारिक समज यांचा अधिक प्रभावी विकास होणार आहे.

याशिवाय, विशेष प्रमाणपत्र अभ्यासक्रम, सागरी नियमन व अनुपालन व्यवस्थापनातील पूर्णवेळ एमबीए, तसेच क्षमता-विकास वेबिनार मालिकांसह अनेक नवीन शैक्षणिक व व्यावसायिक उपक्रम सुरू करण्यात आले आहेत. सदस्य व विद्यार्थ्यांसाठी थेट प्रवेश मार्ग, ऑनलाइन शंका-निवारण वर्ग सुरू करण्यात आले असून ‘स्टुअर्डशिपवरील आयसीएसआय मार्गदर्शक तत्त्वे’, ‘हवामान बदल प्रशासन तत्त्वे’, ‘ईएसजी भागधारक सहभाग टूलकिट’ आणि ‘कार्यस्थळी लैंगिक छळ प्रतिबंध (PoSH) प्रशासकीय मानके’ यांसारखी महत्त्वाची मार्गदर्शक साधनेही सादर करण्यात आली आहेत.

> नियामक मान्यता, शैक्षणिक सहकार्य तसेच सशस्त्र दलातील कर्मचारी, दुर्गम भागातील विद्यार्थी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी शुल्क सवलत व माफीसारख्या सामाजिक उपक्रमांद्वारे, आयसीएसआय मजबूत प्रशासन व व्यावसायिक उत्कृष्टतेच्या माध्यमातून राष्ट्रनिर्माणासाठी आपली बांधिलकी अधोरेखित करत आहे.

# ज्युपिटर हॉस्पिटल येथे गिया -बारे सिंड्रोमसाठी विशेष तात्काळ उपचार क्लिनिकची सुरुवात

**पुणे (दै. संध्या)**




पुण्यातील न्यूरोलॉजिकल सेवा जागतिक दर्जावर नेण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असलेल्या ज्युपिटर हॉस्पिटल, बाणेर, पुणे यांनी आज गिया -बारे सिंड्रोम (GBS) रुग्णांसाठी समर्पित व अत्याधुनिक GBS क्लिनिक आणि तात्काळ उपचार विभाग सुरू केल्याची घोषणा केली.या विशेष क्लिनिकच्या माध्यमातून GBS रुग्णांचे लवकरात लवकर तज्ज्ञांच्या हस्ते अचूक निदान करून ६ ते ८ तासांच्या आत प्रभावी औषधी उपचार सुरू करण्याची सुसज्ज व्यवस्था करण्यात आली आहे. वेळेत उपचार मिळाल्यास रुग्ण पूर्णपणे बरे होण्याची शक्यता लक्षणीयरीत्या वाढते, या उद्देशाने ही सेवा सुरू करण्यात आली आहे.GBS रुग्णांसाठी आवश्यक असलेल्या सर्व तपासण्या, प्रगत निदान सुविधा, समर्पित आयसीयू सपोर्ट तसेच न्यूरोलॉजिस्ट, इंटेन्सिव्हिस्ट, फिजिओथेरपिस्ट, रिहॅबिलिटेशन तज्ज्ञ आणि प्रशिक्षित नर्सिंग टीमची २४ तासांची समन्वयित सेवा या क्लिनिकमध्ये उपलब्ध असेल.

तसेच डिस्चार्जनंतर रुग्णांच्या दीर्घकालीन पुनर्वसनासाठी (रिहॅबिलिटेशन) आवश्यक असलेल्या सर्व सुविधा कमी खर्चात उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.यावेळी माध्यमांशी बोलताना न्यूरोलॉजी विभागाचे संचालक डॉ. राजस देशपांडे म्हणाले,

“गिया -बारे सिंड्रोम हा एक गंभीर न्यूरोलॉजिकल आजार आहे. या आजारात शरीराच्या स्वतःच्या प्रतिकारशक्तीतील काही प्रथिने चुकून नसांवर हल्ला करतात. परिणामी नसांचे नुकसान होऊन हात-पायांमध्ये अचानक अशक्तपणा, पक्षाघात (पॅरालिसिस), चालण्यात अडचण तसेच चेहऱ्याच्या व गिळण्याच्या नसांवर परिणाम होऊ शकतो. काही रुग्णांमध्ये श्वसनशक्ती कमकुवत झाल्यास व्हेंटिलेटरची गरजही भासू शकते.”ते पुढे म्हणाले,

“GBS मध्ये वेळेवर उपचार अत्यंत महत्त्वाचे असतात. योग्य वेळी उपचार सुरू झाल्यास पुढे होणारे घातक परिणाम टाळता येतात आणि रुग्ण पूर्णपणे पूर्ववत होण्याची शक्यता मोठ्या प्रमाणात वाढते. या विशेष क्लिनिकच्या माध्यमातून पुणे व परिसरातील रुग्णांना एकाच ठिकाणी जागतिक दर्जाचे तात्काळ उपचार उपलब्ध होतील.”अशा प्रकारचे क्लिनिक सुरू करण्यामागील मुख्य उद्देश स्पष्ट करताना डॉ. देशपांडे पुढे म्हणाले की,

“सामान्यतः रुग्णाला लक्षणे जाणवायला लागल्यापासून दवाखान्यात दाखल होणे, तपासण्या होणे, योग्य निदान होणे आणि उपचार सुरू होईपर्यंत २४ ते ४८ तासांचा अत्यंत महत्त्वाचा कालावधी वाया जातो, ज्यामुळे रुग्णाची प्रकृती गंभीर होऊ शकते. अनेक वेळा तज्ज्ञ डॉक्टर वेळेवर उपलब्ध न झाल्यामुळे योग्य उपचार देणे कठीण जाते. हे लक्षात घेऊन आम्ही या GBS क्लिनिकमध्ये असा विशिष्ट प्रोटोकॉल तयार केला आहे की रुग्ण हॉस्पिटलमध्ये दाखल झाल्यानंतर ४ ते ६ तासांत सर्व तपासण्या पूर्ण करून तज्ज्ञांच्या सल्ल्याने उपचार सुरू केले जातील.”GBS च्या उपचारांबाबत माहिती देताना ते म्हणाले,

“GBS वर मुख्यतः दोन प्रकारे उपचार करता येतात—IVIG (इम्युनोग्लोब्युलिन) इंजेक्शनद्वारे किंवा प्लाझ्मा एक्स्चेंज (डायलिसिससदृश प्रक्रिया) पद्धतीने. सर्वसाधारणपणे हे उपचार अत्यंत खर्चिक असतात; मात्र या क्लिनिकच्या अंतर्गत आम्ही विशेष सवलती उपलब्ध करून देणार आहोत, जेणेकरून सर्वसामान्य कुटुंबांनाही हे उपचार परवडू शकतील.”यावेळी ज्युपिटर हॉस्पिटलमधील न्यूरोलॉजी कन्सल्टंट डॉ. शिवराज हुंगे म्हणाले,

“GBS क्लिनिक हे केवळ न्यूरोलॉजी विभागापुरते मर्यादित नसून, या संपूर्ण उपचार प्रक्रियेत कार्डिओलॉजिस्ट, पल्मोनोलॉजिस्ट तसेच इंटेन्सिव्हिस्ट यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. या सर्व तज्ज्ञांच्या एकत्रित उपचार पद्धतीमुळे रुग्णावर कमी वेळेत योग्य उपचार करणे आणि सातत्यपूर्ण देखरेख ठेवणे शक्य होते.”ते पुढे म्हणाले,

“इम्युनोथेरपी किंवा IVIG उपचारांनंतरही काही रुग्णांना दीर्घकाळ व्हेंटिलेटरची गरज भासू शकते. मात्र व्हेंटिलेटर काढल्यानंतर स्पीच थेरपी, फिजिओथेरपी आणि रिहॅबिलिटेशनच्या मदतीने रुग्ण पूर्णपणे बरे होऊ शकतो.

ज्युपिटर हॉस्पिटलच्या GBS क्लिनिकमध्ये हे सर्व उपचार आवश्यक त्या सर्व तज्ज्ञांच्या देखरेखीखाली एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.”ज्युपिटर हॉस्पिटल, पुणेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. राजेंद्र पाटणकर यांनी या विशेष GBS क्लिनिकमागील भूमिका स्पष्ट करताना सांगितले,

> “जलद निर्णय प्रक्रिया, विविध विभागांमधील अचूक समन्वय आणि सर्व प्रोटोकॉलचे काटेकोर पालन करून रुग्णाला त्वरित उपचार देणे अत्यावश्यक आहे. या समर्पित GBS क्लिनिकच्या माध्यमातून आम्ही हा समन्वय अधिक प्रभावीपणे साधून अधिकाधिक रुग्णांचे जीव वाचवण्याचा प्रयत्न करू.”या समर्पित GBS क्लिनिकला GBS-तत्पर आयसीयू, प्रगत निदान सेवा, मल्टीडिसिप्लिनरी क्रिटिकल केअर आणि व्यापक पुनर्वसन सुविधांचे सशक्त पाठबळ लाभले आहे. तसेच हे केंद्र रुग्ण व त्यांच्या कुटुंबीयांना आजाराची लक्षणे ओळखण्याबाबत जागरूक करण्यावरही भर देते, ज्यामुळे वेळेवर वैद्यकीय हस्तक्षेप शक्य होतो. प्रत्येक रुग्णासाठी दीर्घकालीन देखभाल योजना आणि मानसिक आधार सुनिश्चित करण्यात येतो.या उपक्रमाद्वारे ज्युपिटर हॉस्पिटल सहजप्राप्य, रुग्णकेंद्रित आणि उच्च दर्जाच्या न्यूरोलॉजिकल देखभालीप्रती आपली वचनबद्धता अधोरेखित करते. या क्लिनिकचे उद्‌घाटन हे विशेष पायाभूत सुविधा, क्लिनिकल नैपुण्य आणि एकात्मिक उपचार पद्धतींच्या माध्यमातून जटिल न्यूरोलॉजिकल विकारांवर प्रभावी उपचार करण्याच्या दिशेने पुणे व महाराष्ट्रातील रुग्णांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवणारा एक महत्त्वाचा टप्पा आहे.